

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा आणि विदर्भात धुमाकूळ घालणाऱ्या पावसाने आता आपला मोर्चा मुंबईसह कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्याकडे वळवला आहे. येणारे दोन दिवस या भागांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरापासून आंध्र प्रदेश आणि ओडिशा किनारपट्टीपर्यंत एक कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले आहे, जे पुढील १२ तासांत तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होऊ शकते. ईशान्य अरबी समुद्रापासून गुजरातपर्यंत हवेच्या वरच्या थरात एक चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. दक्षिण कोकणापासून उत्तर केरळपर्यंत एक द्रोणीय स्थिती तयार झाली आहे. या तिहेरी संगमामुळे राज्यात पावसासाठी अत्यंत पोषक वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी सतर्क राहावे आणि आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३३
www.ramprahar.com

मंगळवार १९ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

तिसरी मुंबई आर्थिक विकासाचा नवा अध्याय -मुख्यमंत्री/२
पनवेल परिसरातील शाळांमध्ये गणेशमूर्ती कार्यशाळा/६
सायकल शर्यतीत अलिबाग येथील रायडर्सचा डंका/८

# राज्यात मुसळधार पावसामुळे हाहाकार!

***जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत***

***नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी***

***धरणांमधूनही पाण्याचा विसर्ग***

***नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा***




## रायगडात कोसळधार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सलग पाचव्या दिवशी पावसाची बरसात सुरू पहावयास मिळाली. जिल्ह्याला सोमवारी (दि.१८) पहाटेपासून पावसाने अक्षरशः झोडपून काढले. जिल्ह्यातील सावित्री, कुंडलिका व अंबा या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. धरण क्षेत्रातदेखील दमदार पाऊस पडत असल्याने धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली असून हेटवणे, भिरा धरणामधून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

चार दिवस रायगडमध्ये पावसाची संततधार सुरू होती. सोमवारी पहाटेपासून पावसाचा जोर वाढला. म्हसळा तालुक्यात सर्वाधिक २१५ मिमी पावसाची नोंद झाली. याशिवाय पनवेल, रोहा, पोलादपूर व श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये १०० मिमीपेक्षा जास्त सरासरीने पाऊस पडला. सोमवारी सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात ९४.०७ मिमीच्या सरासरीने १५५५.०२ पावसाची नोंद झाली. जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले.

म्हसळा तालुक्यातील लेप गौळवाडी येथे एका घराची संरक्षण भिंत कोसळली, तर ढोरजे पूल पुन्हा एकदा पाण्याखाली गेल्याने ढोरजे, कुडतुडी, गौळवाडी व देवघर कोंड या गावांचा संपर्क तुटला. याशिवाय शहरातील मुख्य रस्ता, दिघी रोड परिसर व तहसील कार्यालय परिसर पाण्याखाली गेला.



महाड तालुक्यातील सावित्री, गांधारी, काळ या नद्या उफाळून वाहू लागल्या. त्यामुळे काही रस्ते पाण्याखाली गेले. पुलांवरून वाहणाऱ्या पाण्यामुळे गावांचा संपर्क तुटला. शहरातील गांधारी पूल पाण्याखाली गेल्याने तेथील रस्ता बंद करण्यात आला. त्याचप्रमाणे क्रांती स्तंभाजवळ पुराचे पाणी शिरले. दस्तुरी नाका ते नातेखिंड रस्ताही पाण्याखाली गेला. त्याचप्रमाणे महाड-रायगड रस्त्यावरील वाहतूकदेखील बंद झाली होती. सांदोशी पूल पाण्याखाली गेल्याने सहा ते सात गावांचा संपर्क तुटला.

माणगाव तालुक्यातील निजामपूर भागात रात्रीपासूनच थैमान घातले असून तेथील नदी, नाले, ओढे ओसंडून वाहत होते. त्यामुळे पुराचे स्वरूप दिसून आले. त्याचप्रमाणे माणगाव तालुक्यातील कुंभे गावाकडे जाणाऱ्या मार्गावर दरड कोसळली.

सतत पडत असलेल्या पावसामुळे नद्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. सावित्री, कुंडलिका व अंबा या तीन नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. इतरही नद्या दुथडी भरून वाहत आहेत. हेटवणे व भिरा धणांचे दरवाजे उघडून त्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## मुखेडमध्ये ढगफुटी

### अनेक गावांत शिरले पाणी; १२ जण बेपत्ता

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ढगफुटीसदृश्य पाऊस पडला असून मध्यरात्री अनेक गावांत पाणी शिरले. या नैसर्गिक आपत्तीमधून बऱ्याचशा नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले असले तरी अद्याप १० ते १२ जण बेपत्ता आहेत. प्रशासनाने आता बचावकार्यासाठी सैन्य दलाला पाचरण केले आहे.

मुखेड तालुक्यात लेंडी धरण क्षेत्रातील भिंगोली, भेंडेगाव, हसनाळ, रावणगाव, भासवाडी, सांगवी भादेव यासह परिसरातील इतर गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली. तिथे आठ ते नऊ फूट पाणी शिरले होते. त्यामुळे रात्रीच्या अंधारातच गावातील काही नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले, तर पाच जण बेपत्ता आहेत.

एनडीआरएफचे पथक रात्रीच मुखेड तालुक्यात दाखल झाले होते, पण सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत सहा गावातील दोनशेहून अधिक नागरिक पाण्यात अडकले होते. या आपत्तीमुळे परिसरातील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुखेड तालुक्यातील पूरस्थितीबद्दल माहिती देताना सांगितले की, रावणगाव येथे २२५ नागरिक अडकले होते, ज्यापैकी अनेकांना बाहेर काढण्यात आले आहे. उर्वरित नागरिकांनाही सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हसनाळ येथे आठ, भासवाडी येथे २०, आणि भिंगोली येथे ४० नागरिक अडकले असले तरी ते सर्व सुरक्षित आहेत. दुर्दैवाने पाच नागरिक बेपत्ता असून त्यांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, एकूण वाहून गेलेल्यांपैकी तिघांचे मृतदेह सोमवारी सापडले.

मुखेड तालुक्यात अतिवृष्टीने लेंडी धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. शिवाय लातूर, उदगीर आणि कर्नाटकातून मोठ्या प्रमाणात पाणी येत आहे. येथे झालेला पाऊस सुमारे २०६ मिमी इतका होता. त्यामुळे जीवित व वित्त हानी झाली आहे.

### मराठवाड्यात जनावरेही दगावली

पावसामुळे मराठवाड्यात आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये बीडमध्ये दोन, नांदेड तीन आणि हिंगोलीत एक जणाचा समावेश आहे. याशिवाय अनेक जनावरे दगावली आहेत. नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे पुराच्या पाण्यात बुडून ५० म्हशी मृत्युमुखी पडल्या आहेत. प्रशासनाच्या अंदाजानुसार जिल्ह्यात २००हून अधिक जनावरांचा मृत्यू झाला आहे.

> *नांदेडच्या मुखेड तालुक्यातील पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेणार आहोत. गावांमध्ये चारही बाजूंनी पाणी घुसल्याने नागरिकांची मोठी कोंडी झाली. आपत्तीग्रस्त नागरिकांच्या अन्न, पाणी व निवाऱ्याची व्यवस्था शाळा व शासकीय इमारतींमध्ये केली जात आहे. नागरिकांच्या मदतीसाठी स्थानिक प्रशासन अलर्ट मोडवर आहे.*
>
> ***-गिरीश महाजन,***
> *आपत्ती व्यवस्थापनमंत्री*

## कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रातर्फे मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रत्नागिरी या जिल्ह्यांना १८ ऑगस्ट रात्री ११.३० ते २० ऑगस्ट रात्री ८.३०पर्यंत ३.५ ते ४.३ मीटर तसेच पालघर, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना १९ ऑगस्ट सकाळी ८.३० ते २० ऑगस्ट रात्री ८.३०पर्यंत ३.५ ते ४.२ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे.

या कालावधीत समुद्राची स्थिती खवळलेली व ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याकडून १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून याबाबत नागरिकांना सतर्क करण्यात आले आहे तसेच अधिकच्या अतिवृष्टी इशाऱ्यामुळे भूस्खलनाच्याबाबत सर्व आवश्यक कार्यवाहीसाठी जिल्हा प्रशासनाला कळविण्यात आले असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## मुंबईत पावसाचे धुमशान | रस्ते, रेल्वे आणि विमानसेवा विस्कळीत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत रविवारी रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे अनेक भागांत पाणी साचून रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला. काही परिसरांमध्ये रूळांवर पाणी आल्याने रेल्वेसेवाही प्रभावित झाली, तर हवाई वाहतूकही पावसामुळे बाधित झाल्याचे पहावयास मिळाले.

अंधेरी सबवे, किंग्ज सर्कल, दादरच्या काही भागात पाणी साचले. त्यामुळे वाहचालकांनी कसरत करावी लागत होती. काही गाड्यांमध्ये पाणी जाऊन त्या बंद पडल्या. त्यामुळे हे प्रवासी तसेच पादचारी पाण्यातून वाट काढून पुढे जात असल्याचे दिसून आले.



मानखुर्द, गोवंडी, कुर्ला आणि टिळक नगरसारख्या परिसरांमध्ये रुळांवर पाणी आल्याने हार्बर मार्गावरील लोकल गाड्या ८ ते १० मिनिटे उशिराने धावत होत्या. मध्य रेल्वे मार्गावर कर्जत ते कल्याण आणि कसारा ते कल्याण या मार्गांवर कमी दृश्यमानतेमुळे रेल्वे गाड्यांना आठ मिनिटांपर्यंत उशीर झाला.

मुंबईत सुरू असेलल्या मुसळधार पावसाचा फटका रेल्वे आणि रस्त्यावरील वाहतुकीला बसलाच. शिवाय हवाई वाहतूकही पावसामुळे बाधित झाली. रात्रीपासून पडत असलेला मुसळधार पाऊस आणि वातावरण खराब झाल्यामुळे मुंबईत विमान उतरण्यात अडचणी येत होत्या. सकाळपासून नऊ विमानांचे लँडिंग रद्द करण्यात आले. काही विमानांना गो-अराऊंड करण्यात आले, तर खराब हवामानामुळे एक विमानाला दुसरीकडे वळविण्यात आले.

हवामान खात्याने मुंबईसाठी मंगळवारपर्यंत रेड अलर्ट जारी केला आहे. नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे तसेच मुंबईतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

## नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे निर्देश



**मुंबई : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीमुळे राज्यात शेत पीक, फळ बागांचे नुकसान झाल्यास संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचे पंचनामे तातडीने करून त्याचा अहवाल विनाविलंब सादर करावा, असे निर्देश मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले आहेत.

मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले, हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात पुढील चार दिवस अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. प्रशासनाने या भागातील नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी सर्तक रहावे.

शासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या घटकांना त्वरित मदत व दिलासा मिळावा यासाठी प्रशासनाने अतिवृष्टी, पुरामुळे बाधितांचे तातडीने पंचनामे करावेत. या नुकसानीचा अहवाल संबधित विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा, असेही मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले आहे.

## राज्यातील पावसाच्या स्थितीचा मुख्यमंत्री फडणवीसांकडून आढावा

### सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १८) मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला असल्याने पुढील काही दिवस सतर्क राहण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.

या वेळी आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, माहिती व तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आपत्ती व्यवस्थापन अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

बैठकीत विभागीय आयुक्तांनी आपापल्या विभागातील पावसाबाबतची माहिती सादर केली. रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यात अधिक पाऊस झाला असून हवामान खात्याने १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस



सतर्क राहण्याचे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिले.

मागील दोन दिवसांत राज्यात विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आहे. कोकणातील काही नद्यांनी धोका पातळी ओलांडली असून दुसरीकडे उत्तर महाराष्ट्रात जळगावमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अलमट्टी धरणातील पाण्याच्या विसर्गाबाबत कर्नाटक सरकारशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून सध्या धोका नसला तरी यंत्रणा सतर्क ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले. मुखेडमधील परिस्थिती नियंत्रणात आली आहे. त्याचबरोबर विष्णूपुरीकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील ८०० गावे बाधित झाली आहेत. दक्षिण गडचिरोलीत प्रशासन सतर्क आहे. अकोला, चांदूररेल्वे, मेहकर, वाशिम येथे परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. विदर्भात प्राथमिक अंदाजानुसार दोन लाख हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले आहे.

मुंबईत सोमवारी सकाळपासून अवघ्या आठ तासांत १७० मिमी पाऊस झाला आहे. शहरात पाणी तुंबल्यामुळे दोन ठिकाणी वाहतूक प्रभावित झाली. रेल्वे, मेट्रो व इतर वाहतूक सुरळीत सुरू आहे. पुढील १० ते १२ तास मुंबईसाठी अत्यंत महत्त्वाचे असून प्रशासनाने काळजी घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. उद्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शाळांना सुटी जाहीर करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासन व महापालिकांना देण्यात आला आहे.

- मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना दिलेल्या सूचनांमध्ये एसएमएस अलर्ट पाठवताना वेळेचा अचूक उल्लेख करावा, येणारे अलर्ट गांभीर्याने घ्यावेत, स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तातडीच्या मदतीसाठी मंत्रालय गाठण्याची गरज नाही. स्थानिक पातळीवरच निधी व अधिकार देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

- घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामे योग्य पद्धतीने करण्याचे निर्देशही देण्यात आले. धोक्याची पातळी वाढण्यापूर्वी संपर्क साधण्यास सांगण्यात आले. पर्यटकांच्या ठिकाणी पोलिसांनी सतर्क रहावे, दरडी कोसळणाऱ्या भागात आधीच यंत्रणा कार्यरत करावी तसेच निवारा केंद्रात भोजन, शुद्ध पाणी व पांघरूण यांची पुरेशी सोय करावी, असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

## कंटेनरवाहू ट्रक उलटून भरपावसात वाहतूक ठप्प

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर शहरालगत असलेल्या चोळई गावाजवळ सोमवारी (दि. १८) दुपारी कंटेनरवाहू १२ चाकी ट्रक उलटला. या अपघातामुळे भरपावसात वाहतूक काही काळ ठप्प झाली.

चिपळूण बाजूकडून मुंबई दिशेने जाणारा कंटेनरवाहू ट्रक (जीजे१० टीव्ही ६५५०) कशेडी घाटातील चोळई गावाच्या तीव्र वळण उतारावर चालकाचा ताबा सुटल्याने महामार्गावरील बॅरिकेटस तोडून उलटला. अपघातात चालक किरकोळ जखमी झाला.

या अपघातामुळे महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. कंटेनरमधील सामान आणि वाहनाचे अवशेष बाजूला केल्यानंतर दोन्ही बाजूने एकेरी वाहतूक सुरू करण्यात वाहतूक पोलिसांना यश आले.

## रायगडातील शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला मागील पाच दिवसांपासून पावसाने झोडपले असून सोमवारी तर जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, मंगळवारीही (दि. १९) अतिवृष्टीची शक्यता असून त्या पार्श्वभूमीवर रायगडातील शाळा, महाविद्यालयांना जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे यांनी सुट्टी जाहीर केली आहे.

प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार सोमवारी रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा रेड अलर्ट इशारा देण्यात आला होता. त्यानुसार जिल्ह्यात दिवसभर सर्वच भागात जोरदार पाऊस पडला. त्यातच समुद्रास असणाऱ्या भरतीमुळे कुंडलिका, अंबा, सावित्री या नद्यांनी धोकापातळी ओलांडली. त्यामुळे सखल भागात पुराचे पाणी शिरले. शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या पावसाचा फटका बसला. त्यामुळे दुपारनंतर अनेक ठिकाणी शाळांना सुट्टी देण्यात आली. मंगळवारीही मुसळधार पावसाची शक्यता आहे.



सर्व बाबी तसेच उपविभागीय अधिकारी यांच्याकडील अहवालाचे अवलोकन करता खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या शाळा व महाविद्यालये यांना मंगळवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, मात्र शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कामावर यावे लागणार आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. जावळे यांनी जारी केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# तिसरी मुंबई आर्थिक विकासाचा नवा अध्याय -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगरक्षेत्राच्या विकासासाठी रायगड जिल्ह्यात तिसरी मुंबई विकसित करण्यात येत आहे. ही तिसरी मुंबई म्हणजे आर्थिक विकासाचा नवा अध्याय असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वरळी येथे गोल्डमन सॅक्स या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक बँकेच्या नव्या, विस्तारित मुंबई कार्यालयाचे उद्घाटन सोमवारी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी गुंतवणूकदारांशी चर्चा करताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गोल्डमन सॅक्ससारख्या जागतिक वित्तसंस्थेचे नवे कार्यालय महाराष्ट्रात उघडले जाणे ही राज्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. यामुळे महाराष्ट्रातील कुशल मनुष्यबळ, भक्कम बाजारपेठा आणि गुंतवणूक-अनुकूल वातावरणाची पुष्टी होते. ही घटना महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रातील नेतृत्वाला अधोरेखित करणारी आहे. महाराष्ट्र शासन विकासासाठी कटिबद्ध असून, खासगी क्षेत्रासोबत भागीदारीतून 'तिसरी मुंबई' घडवण्यासाठी कार्यरत आहे. तिसऱ्या मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यापीठांची केंद्रे उभारण्यात येत आहेत. मुंबई आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

वैद्यकीय महाविद्यालय उभारली जाणार असून या ठिकाणी इनोवेशन हब होणार आहे. त्यामध्ये संशोधनासाठीच्या सर्व सुविधा असतील. तसेच क्वांटम कम्प्युटिंग क्षेत्रातील संशोधन व 'एआय' आधारीत व्यवस्था असेल. तिसऱ्या मुंबईची सध्याच्या मुंबईसोबत कनेक्टिव्हिटी उत्तम असेल. कोस्टल रोड, अटल सेतूसोबतच सध्या काम सुरू असलेला वरळी-शिवडी लिंक रोड असेल. मुंबईच्या विकासाला आणखी गती देण्याचे काम ही तिसरी मुंबई करेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

या क्षेत्राच्या विकासामध्ये खासगी गुंतवणूकदारांनी गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा. खासगी आणि सरकारी भागीदारीतूनच चांगला विकास होतो. येथे येणाऱ्या गुंतवणूकदारांना लागणाऱ्या सर्व मंजुऱ्या देण्याचे काम शासनस्तरावरून जलद पूर्ण करण्यात येईल. महाराष्ट्र गुंतवणूक स्नेही राज्य आहे. इज ऑफ ड्यूइंग बिसनेससाठी सध्या काम सुरू आहे. गुंतवणूकदारण कोणत्याही अडचणी येणार नाहीत यासाठी आम्ही काम करत आहोत. कोणतीही अडचण आल्यास ती तत्परतेने सोडवण्यात येत आहे. त्यामुळे तिसऱ्या मुंबईच्या विकासात गुंतवणूकदारांनी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# नागोठण्यातील अंबा नदीने ओलांडली धोक्याची पातळी

## एसटी बसस्थानकासह मुख्य रस्त्यावर पाणी

**नागोठणे : बातमीदार**

सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने सुधागड तालुका व रोहा,नागोठणे परिसराला अक्षरशः झोडपून काढले. त्यामुळे दोन ते तीन दिवसांपासून दुथडी भरुन वाहणाऱ्या नागोठणे येथील अंबा नदीने शेवटच्या श्रावणी सोमवारी (दि.१८ ऑगस्ट ) रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास धोक्याची पातळी ओलांडली. सखल भागातील एसटी बस स्थानक, स्थानिक टेम्पो स्टँड परिसरात, कोळीवाडा परिसर,विशाल मेडिकल शेजारील मरीआई देवी मंदिरासमोर तसेच नागोठणेहून पेणकडे जाण्यासाठी असलेल्या गावातील मुख्य रस्त्यावर पूराचे पाणी आले होते.

अंबा नदीला यावर्षी हा तिसऱ्यांदा पूर आला आहे.



मुसळधार पावसामुळे नागोठणे येथील अंबा नदीला आलेल्या पुराचे पाणी नदी काठावरील सखल भागात शिरल्याने जनजीवन विस्कळित झाले. मिनी डोअर रिक्षा सेवा पूर आल्याने बंद करण्यात आली होती. त्यांनी एसटी मुंबई गोवा महामार्गावर आपल्या रिक्षा उभ्या ठेवल्या होत्या. बस स्थानकात पुराचे पाणी शिरल्याने तसेच वन विभागाच्या कार्यालयापुढे व हॉटेल लेक व्ह्यू समोर मुख्य रस्त्यावर पुराचे पाणी आल्याने एसटी बसची वाहतूक पूर्णपणे कोलमडली होती. त्यामुळे एसटी बस शहराबाहेरील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील मुंबई गोवा महामार्गावर थांबविण्यात येत होत्या. नदी काठावरील सखल भागातील दुकानदारांकडून आपला माल सुरक्षित स्थळी हलविण्यात येत होते.

# भाजपा खालापूर तालुका पश्चिम मंडळ कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, भाजपा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, लोकनेते रामशेठ ठाकूर आणि पनवेल विधानसभा आमदार प्रशांत ठाकूर, उरणच विधानसभा आमदार महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुका पश्चिम मंडळाचे अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी खालापूर तालुका पश्चिम मंडळाची कार्यकारिणी जाहीर केली.

यानुसार खालापूर तालुका पश्चिम मंडळाच्या सरचिटणीस पदी प्रवीण जांभळे, गणेश कदम, उपाध्यक्षपदी गोपीनाथ जाधव, काशिनाथ गावडे, नितीन तवळे, राकेश खारकर, देविदास पाटील, अश्विनी माळी, चिटणीस पदी गणेश मुकादम, दीपक कांबळे, गौरी गडगे, ताई पवार, श्रुती कुरंगळे, वृषाली पोलेकर,कोषाध्यक्षपदी प्रदोष भद्रीके व इतर ४५ कार्यकारिणी सदस्यपदी म्हणून नेमणूक करण्यात आले.


तसेच महिला मोर्चा अध्यक्षपदी सुनंदा जमदाडे, युवा मोर्चा अध्यक्षपदी प्रणित सांगळे, ओबीसी मोर्चा अध्यक्षपदी प्रतीप पाटील, किसान मोर्चा अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कुरंगळे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्षपदी स्वप्निल जोशी, अनुसूचित जमाती मोर्चा अध्यक्षपदी राम शिगवा, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्षपदी अजित राय, कायदा सेल संयोजक पदी सचिन चाळके, वैद्यकीय सेल संयोजक पदी विजय ठोसर, मीडिया सेल संयोजक पदी संदीप म्हात्रे, व्यापार आघाडी संयोजकपदी अमित शहा आणि वासांबे जिल्हा परिषद अध्यक्षपदी सचिन तांडेल, वडगाव जिल्हा परिषद अध्यक्षपदी महादेव गडगे, चौक जिल्हा परिषद अध्यक्षपदी संदीप जाधव, चांभार्ली पंचायत समिती अध्यक्षपदी भूषण पारंगे, वासांबे पंचायत समिती अध्यक्षपदी आकाश जुईकर, वडगाव पंचायत समिती अध्यक्षपदी विनोद भोईर, चौक पंचायत समिती अध्यक्ष पदी ओमकार गावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# पोलादपूर तालुक्यात तहसीलदारांकडून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**पोलादपूरग : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पावसाची नोंद दररोज शंभरीपार करीत असल्याने यंदा गणेशोत्सवापूर्वीच पोलादपूर तालुक्यातील सरासरी पावसाची नोंद ३ हजार पार झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील धरणातील पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीपर्यंत सोमवारी दुपारी ३ वाजता पोहोचण्याची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर पोलादपूर तहसिलदार कपिल घोरपडे यांनी दरडप्रवण व पूररेषेखालील लोकवस्त्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

पोलादपूर तालुक्यातील सावित्री नदीपात्रावरील देवळे येथील धरण पूर्णपणे उखडून काढण्यात आल्यानंतर नदीच्या प्रवाहावर केवळ पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे एकमेव धरण असून या धरणामध्ये देवळे धरणापासून यंदा मोठया प्रमाणात गाळ व लालमाती वाहून आल्याने धरणाचा गाळ अधिक झाला आहे. अशातच, यंदा मे





महिन्यापासून अवकाळी पावसासोबतच मॉन्सूनने आगमन केल्याने रानबाजिरे धरणाच्या बॅकवॉटरचा विसर्ग करण्यात आला नव्हता.

१५ ऑगस्टपर्यंत तिरंगी प्रकाशझोतात आकर्षक वाटणारे रानबाजिरे धरण सोमवारी आक्राळविक्राळ रूप घेत ओसंडून वाहू लागले. दुपारी ३ वाजता ५७.४० मीटर धरणाच्या पाण्याची पातळी झाली असताना विसर्ग ७४९.५६२ घनमीटर प्रतिसेकंद करण्यात आला. यामुळे धरणाच्या विसर्गामुळे सांडव्यातून कर्णकर्कश्य आवाजाने पाणी सावित्री नदीपात्रातून पोलादपूर महाडच्या दिशेने वाहून लागले. पोलादपूरचे तहसिलदार कपिल घोरपडे यांनी सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांच्यासह पोलादपूर शहर, कशेडी घाटासह, राजेवाडी पंढरपूर रस्त्यावरील सवाद फाटयापर्यंत पाहणी करून दुपारी चार वाजताच नदीपात्रालगतच्या लोकवस्तीसह दरडप्रवण क्षेत्रातील लोकांना सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याचे निर्देश दिले.

पोलादपूर तालुक्यातील पळचिल सावरीची वाडी येथे रविवारी महाकाय वृक्ष कोसळल्याने रस्ता वाहतुकीसाठी काही काळ बंद होता. तहसिल कार्यालयातील आपत्तीनिवारण कक्षातर्फे जेसीबी पाठवून हे झाड हटविण्यात आले. याखेरिज, कशेडी घाटात चोळई गावातही कंटेनर कलंडल्याने सोमवारी दुपारी काही काळ वाहनांच्या खुप दूरवर रांगा लागल्या होत्या.

# महिलेसह चिमुकला बेपत्ता

**महाड : प्रतिनिधी**

गोवेल पोलादपूर येथे राहणारी एक २४ वर्षीय महिला आपल्या एक वर्षाच्या लहान मुलाला घेऊन महाड तालुक्यातील वाळण या गावी माहेरी रक्षाबंधनाला आली होती मात्र ती आपल्या घरी परत न गेल्याने महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती प्रमाणे रंग गोरा,उंची ५ फूट ५ इंच,अंगाने सडपातळ कोणालाही माहिती मिळाली तर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात कळवावे

# बेलापूर दशक्रिया विधी ठिकाणी आमदार मंदा म्हात्रे यांची पाहणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर गावातील जेट्टीवर गावातील व इतर परिसरातील नागरिक दशविधी क्रिया करण्यासाठी येत असतात. परंतु सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुख सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय होते.याच अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी आज प्रत्यक्षात जाऊन पाहणी केली असून सदर ठिकाणी त्वरित सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी केली आहे.

सदर दशक्रिया ठिकाणी पाहिलं असता तिकडे ठोकण्यात आलेल्या पत्र्यांमुळे व शेडच्या दुरावस्थामुळे तासनतास भर पावसात नागरिकांना उभं राहावं लागतं आहे. ही जागा सिडको निर्मित असल्यामुळे या ठिकाणी माझ्या आमदार निधी अंतर्गत सुरू असलेलं काम देखील बंद पाडण्यात आलं असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. इथं विविध सुविधांच्या कमतरतेमुळे नागरिकांवर आज ही वेळ ओढवली आहे.नवी मुंबई मनपा संबंधित अधिकाऱ्यांनी हे पत्रे का आणि कशासाठी ठोकले आहेत ? यावर ठोस उपाययोजना करून तात्काळ नागरिकांना होणाऱ्या त्रासाची मनपा प्रशासनानी त्वरित दखल घेऊन मार्ग काढावा असे आ. म्हात्रे यांनी बोलताना सांगितले.

# तळा तालुक्यात श्रावणसरी नृत्य स्पर्धा

## पिटसईकोंड महिला मंडळाने पटकावला प्रथम क्रमांक



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात भव्य श्रावणसरी नृत्य स्पर्धेचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महीला आघाडी तळा तालुका व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला तळा शहर यांचे माध्यमातून तळा येथे खासदार सुनिल तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे,मा. आमदार अनिकेत तटकरे यांचे मार्गदर्शनाखाली श्रीचंडिकादेवी मंदिर हॉल येथे आयोजित केल्या होत्या.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नाना भौड, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे,माजी महिला व बालकल्याण सभापती गीताताई जाधव, माजी समाजकल्याण सभापती हिराचंद तांबे, माजी सभापती अक्षरा कदम, शहर अध्यक्ष मेघा सुतार, नगरसेविका अस्मिता भोरावकर, नगरसेवक मंगेश शिगवण, युवक अध्यक्ष देवा रामाणे, जगदिश शिंदे, नागेश लोखंडे, सरपंच, राष्ट्रवादी कार्यकर्ते, नृत्य सादर करणाऱ्या महिला आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी या स्पर्धेत ग्रामीण व शहरी अशा एकूण १५ ग्रुपनी भाग घेतला होता.पारंपारिक नृत्याचे सगळ्या महिला वर्गातून छान सादरीकरण करण्यात आले.या नृत्य स्पर्धेतून कोणत्या संघांचे नंबर काढावे असा प्रश्न परीक्षकां समोर आला असेल असे नृत्य सादरीकरण झाले होते.या स्पर्धेत

प्रथम क्रमांक पिटसईकोंड महिला मंडळ ग्रुप, द्वितीय क्रमांक भैरवनाथ महिला मंडळ उसर, तृतीय क्रमांक आशासेविका महिला गट उत्तेजनार्थ भोईर आळी महिला, आई एकविरा महिला मंडळ तळा शहर, चाफेवाडी सालशेत महिला मंडळ, आईचंडीकाच्या लेकी महिला मंडळ तळा शहर यांनी नंबर पटकावले. या स्पर्धांचे परीक्षण अनिल शेलार व निलीमा काप यांनी केले.

यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या यशस्वी ग्रुपना मान्यवरांचे हस्ते रोख रक्कम सन्मानचिन्ह असे पारीतोषिक देण्यात आले.

# श्रीवर्धन-मुंबई मार्गावर गळकी 'लाल परी', प्रवाशांना मनस्ताप



**श्रीवर्धन : बातमीदार**

शनिवारी गोकुळाष्टमी हा उत्सव असल्याने श्रीवर्धन तालुक्यातील मुंबईत राहणारे असंख्य नागरिक सण साजरा करण्यासाठी गावाकडे आले होते. त्यामुळे रविवारी मुंबईकडे परतीच्या प्रवासासाठी असलेल्या सर्व गाड्या पूर्णपणे भरून जात होत्या. मात्र त्यानंतर देखील श्रीवर्धन बस स्थानकामध्ये मुंबईला जाणारे अनेक प्रवासी असल्याचे लक्षात आल्यानंतर, श्रीवर्धन आगाराने साडेचार वाजता श्रीवर्धन मुंबई ही जादा बस गाडी सोडली. सदरची बस श्रीवर्धन परिवहन स्थानकामधून सुटली. त्यावेळी पाऊस अत्यंत रिमझिम पडत होता.

परंतु बस जसवली फाट्याच्या पुढे गेल्यानंतर पाऊस जोराने सुरू झाला व संपूर्ण बस मध्ये भरपूर पाणी गळू लागले. त्यामुळे प्रवाशांनी वाहकाकडे तक्रार केल्यानंतर बोडणी घाटातून बस परत फिरवण्यात आली. व श्रीवर्धन बस स्थानकात आणण्यात आली. श्रीवर्धन स्थानकामध्ये त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या वाहतूक नियंत्रकांबरोबर प्रवाशांनी हुज्जत घातल्यानंतर पर्यायी बस देण्यात आली, परंतु सदरची बसदेखील पूर्णपणे गळकी होती. आसनांची मोडतोड झालेली होती, आणि सायंकाळी ४.३० वाजता सुटणारी बस ही मुंबईला पोहचेपर्यंत रात्र होणार होती. अशा परिस्थितीत गळकी बस प्रवाशांना देऊन प्रवाशांच्या मनस्तापाचे कारण ठरले.


## दुखवटा

### किरण बाथम



**मुरुड :** रायगड जिल्ह्यात २५ वर्षांपेक्षा अधिक काळ पत्रकारितेत सक्रियपणे काम करणारे तसेच मुरुड तालुका पत्रकार संघाचे संस्थापक, माजी अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार किरण पितांबर बाथम (वय ५८) यांचे सोमवारी १८ ऑगस्ट रोजी सकाळी दुःखद निधन झाले. त्यांनी अनेक वर्षे दैनिक रत्नागिरी टाइम्स रायगड आवृत्तीमध्ये काम केले. त्याचबरोबर इतर विविध वृत्तपत्रात काम पाहिले. स्थानिक प्रश्नांवर प्रशासनाला हलवून टाकणारे लिखाण हे त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण ठरत होते. रायगड जिल्ह्यातील बहुतांश राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे जवळचे संबंध होते. त्यांनी अनेक वृत्तवाहिन्यांमध्येदेखील काम केले. रायगड जिल्ह्यातील मुरुड हे त्यांचे गाव, पण त्यांनी अलिबाग आणि पनवेल हे आपले कार्यक्षेत्र निवडले. किरण बाथम हे साईभक्त होते. पनवेलच्या साईदरबारात त्यांचे कायम जाणे येणे असायचे.

### ॲड. सागर पाटील



**अलिबाग :** अलिबाग नगर परिषदेचे माजी नगरसेवक ॲड. सागर रामकृष्ण पाटील यांचे सोमवारी (दि.१८) निधन झाले. ते ६२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे. रामनाथ येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.ॲड. सागर पाटील पाटील दोन वेळा अलिबाग नगरपरिषदेचे नगरसेवक म्हणून निवडून आले होते. काँग्रेसच्या अलिबाग शहर अध्यक्ष पदाची जवाबदारी देखील सांभाळली होती. अलिबागमधील कुलाबा नागरी सहकारी पतसंस्थेचे ते संस्थापक होते.

### अशोक ठाकूर



**उरण :** आवरे येथील आत्माराम ठाकूर मिशन संचलित व जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुलचे संस्थापकीय अध्यक्ष अशोक जनार्दन ठाकूर (वय ५७) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांच्या अंत्यविधीसाठी पाणदिवे येथील शाळेचे चेअरमन प्रकाश पाटील, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, नागरी संरक्षण दलाचे एम.के. म्हात्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# रसायनीतील उसराई गोविंदा पथक ठरले अजिंक्य



**कर्जत : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे या वर्षीदेखील कर्जत नगर परिषद हद्दीत मुद्रे प्रभागातील माजी नगरसेवक संतोष पाटील आणि नगरसेविका संचिता पाटील यांनी पाटील मित्र मंडळाच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले होते. यामध्ये रसायनीचा उसराई गोविंदा पथक खुल्या गटात अजिंक्य ठरला, तर कर्जत तालुका मर्यादित प्रथम क्रमांक धापया गोविंदा पथक कर्जत पाटील आळीने पटकवला. या उत्सवात राजकीय बेरजेची गणिते जुळत असल्याचे स्पष्ट पणे दिसले.

संतोष पाटील मित्र मंडळाच्या वतीने दही हंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खास आकर्षण ठरल्या त्या अभिनेत्री अक्षया हिंदळकर तर मराठी चित्रपट पीएसआय अर्जुन फेम आणि झी मराठी वाहिनीवरील पुन्हा कर्तव्य आहे या मालिकेतील वसू. करमणूकीसाठी सज्ज होते लाईव्ह ऑर्केस्ट्रा यांचा सदाबहार गाणी आणि नृत्य.

गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीत एकमेकां विरुद्ध लढलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अपक्ष उमेदवार सुधाकर घारे व शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत हे उपस्थित राहिल्याने या राजकीय दहीहंडीकडे सर्वांचेच विशेष लक्ष होते.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पनवेल मनपा सतर्क

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात गेल्या दोन दिवसापासून जोरदार पर्जन्यवृष्टी होत असून भारतीय हवामान विभागाने १९ ऑगस्ट रोजीदेखील रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट दिला असून मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. सोमवारी पहाटेपासूनच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात मुसळधार पाऊसास सुरूवात झाली. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर असून पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज व सतर्क राहण्याचे आदेश तर नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.



जोरदार पडणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना चोवीस तास सतर्कता बाळगण्याच्या व परिस्थितीची पहाणी करण्यासाठीच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान, पनवेलमधील बांठिया शाळेजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साठले असून आयुक्त मंगेश चितळे व परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहाणी केली. याच बरोबर कळंबोलीमध्येही प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली. तर उपायुक्त रवीकिरण घोडके, प्रभारी अधिक्षक रोशन माळी यांनी प्रभाग क्रमांक १७ पनवेलमध्ये नदी काठची पाहणी केली. कळंबोली मधील २० ठिकाणी २० एचपी पंपाच्या माध्यमातून काढण्यात येत असून याठिकाणी कोठेही पाणी साठणार याची काळजी महापालिकेच्यावतीने घेण्यात येत आहे. तसेच सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने यांनी एचओसी कॉलनी आदिवासी वाडी येथे भेट दिली.

उपायुक्त रवीकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर व सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर व प्रभाग अधिक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखीखाली पनवेल शहरातील कोळीवाडा भारत नगर झोपडपट्टी, पटेल मोहल्ला मधील १२५ नागरिकांना कोळीवाडा शाळेमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच कोळीवाड्यातील १३३ नागरिकांना उर्दु प्राथमिक शाळा येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच क्रिडा संकुल येथे ६० लोकांना स्थलांतरित करण्यात आले आहे.

**स्थलांतरितांना पालिकेकडून मदत**

या ठिकाणी चहा, जेवण,

## आपत्कालीन यंत्रणा अलर्ट मोडवर

आरोग्य सेवा व पाण्याची सोय पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात येणार आहे. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाच्यावतीने मदत सुरू करण्यात आली आहे. हवामान खात्याने मंगळवारी देखील रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्यावतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

**पाणी पातळीवरदेखील लक्ष**

सध्या गाढी नदी इशारा पातळी ६ मी एवढी असून सध्या पाण्याची पातळी ३.७५ मीटर आहे. चारही प्रभागातील प्रभाग अधिकाऱ्यांना त्या त्या विभागातील अद्ययावत माहिती देण्याविषयी आयुक्तांनी सूचित केले आहे. कळंबोली मध्ये भरपूर पाणी साठते, त्यामुळे कळंबोली मधील पाणी उपसा करणारे डिझेल व इलेक्ट्रिक पंप सातत्याने सुरु ठेवण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच पनवेलमध्ये गाढी नदीच्या पाणी पातळीवरदेखील लक्ष ठेऊन याबाबतची माहिती देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

**नागरिकांनी काळजी घ्यावी**

मुसळधार पावसात नागरिकांनी धोकादायक इमारतीमध्ये आसरा घेऊ नये तसेच झाडे होर्डिंग्जखाली उभारू नये असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी महापालिका तत्पर असून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. महापालिकेच्या सर्व विभागांनी आयुक्तांच्या निर्देशानुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोडवर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त व उपायुक्तांनी महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## अशोक गायकर यांचे सहा वर्षांसाठी निलंबन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पक्षाच्या विरोधात वर्तन करत असल्याबद्दल भिंगार ग्रामपंचायतीचे उपसरपंच व भाजप कार्यकर्ते अशोक राजाराम गायकर यांचे भारतीय जनता पक्षातून सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले आहे.

अशोक गायकर हे पक्षाच्या विरोधात सातत्याने भूमिका घेऊन आपल्या वर्तनातून पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचे काम करीत असल्याच्या तक्रारी वारंवार पक्षाकडे येत आहेत. त्या अनुषंगाने या संदर्भात वारंवार समज देऊनसुद्धा ते पक्षाविरोधात कार्यवाही करत आहेत. पक्षाच्या विरोधात करण्यात येत असलेल्या वर्तनामुळे उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या शिफारशीनुसार अशोक गायकर यांचे सहा वर्षांकरिता निलंबन करण्यात आले असून त्या संदर्भातील पत्र भाजप पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांनी गायकर यांना पाठवले आहे.

## रूमच्या नावाखाली लाखोंचा गंडा

**पनवेल :** करंजाडे येथे रूम देतो असे सांगून तक्रारदारास कोणतीही रूम न देता तसेच त्यांच्या कडून घेतलेले जवळपास १८,५०,००० रुपये रक्कमेचा अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कैलासचंद्र प्रजापती यांना आरोपी केतन भानुशाली, एजंट मुकेशसिह आदीनी आपसात संगनमताने कैलासचंद्र याना करंजाडे येथे रूम देतो असे सांगून त्यांना कोणतीही रूम न देता तसेच त्यांच्या कडून घेतलेले जवळपास १८,५०,००० रुपये रक्कमेचा अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पनवेल : भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे आणि कळंबोली उपाध्यक्ष मनिषा निकम यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी खारघर महिला मोर्चाच्या अध्यक्ष साधना पवार, मधुमिता जेना, अश्विनी भुवड, सीमा खडसे, प्रिया दळवी, निता अधिकारी, सुलभा साखरे, सुनीता हिरवले, ज्योती पाटील आदी उपस्थित होत्या.**





**पनवेल : शहरातील म्हात्रे हॉस्पिटलमध्ये नव्याने विजया रोबोटीक जॉइन्ट रीप्लेसमेंट सेंटर सुरू झाले आहे. या सेंटरचे उद्घाटन रविवारी मान्यवरांच्या हस्ते झाले. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, डॉ. म्हात्रे आदी उपस्थित होते.**

## इमारतीत घुसून मंगळसूत्र लुटले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या करंजाडे भागातील समर्थ आंगण सोसायटीच्या आवारात घुसून लिफ्टमध्ये जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या विवाहितेवर हल्ला करीत तिच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरांनी खेचून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या चोरांचा शोध सुरू केला आहे.

पनवेलच्या करंजाडे सेक्टर ४ भागातील समर्थ आंगण सोसायटीत राहणारी अनुराधा धोत्रे (वय २५) ही विवाहिता बाजारात खरेदीसाठी गेली होती. इमारतीच्या लिफ्टजवळ पोहोचली असताना एका लुटारूने लिफ्टमध्ये जाण्यासाठी उभ्या असलेल्या अनुराधाला मागून जोरात धक्का दिला. यामुळे ती खाली कोसळल्यानंतर लुटारूने तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले.

## वक्तृत्व स्पर्धेच्या शाळा अंतर्गत फेरीमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांना आपली मते प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी आणि वक्तृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल कामोठे येथे शाळा अंतर्गत फेरी उत्साहात पार पडली होती. या फेरीतून प्रत्येक इयत्तेतून ६ विद्यार्थी पुढील अंतरशालेय फेरीसाठी पात्र झाले आहेत. एकूण ६० विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, उच्चार, देहबोली व सादरीकरणाच्या कौशल्याचा विशेष गौरव करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, माजी अध्यक्ष रवी जोशी, डॉ. सखाराम गारळे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, प्रविण कोरडे, अमोल बिनवडे यांच्यासह कोशिश फाऊंडेशनचे स्वयंसेवक, शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिकमुक्त भारत, मोबाईल नसते तर?, इंटरनेट – वरदान की शाप? अशा विविध विषयांवर जोशपूर्ण आणि प्रभावी भाषणे दिली होती. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, विचार मांडण्याची क्षमता सुधारली आणि व्यासपीठावर बोलण्याची भीती कमी झाली. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होतो, असे मत यावेळी प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.

## पोदी येथील काळुंदे नदीकिनारी वृक्षारोपण







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री नारायण चैतन्य ट्रस्ट पनवेल यांच्या वतीने पनवेल रेल्वे स्टेशन पोदी येथील नदीकाठी पॉवर हाऊसजवळ लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला ट्रस्ट अध्यक्ष भक्तवत्सलन, सचिव जयचंद्रन वासू, जे प्रकाश, ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर थवई, भाजप बूथ अध्यक्ष व ट्रस्टचे सचिव जयचंद्रन वासू आदी पुरुष, महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

दरम्यान, आधी ज्या जागेत डेब्रिज टाकले जायचे तेथे वृक्षारोपण केल्यामुळे कचरा टाकला जाणार नाही. यामुळे पनवेल क्लीन व ग्रीन होण्यास हातभार लागेल. यासोबतच त्या विभागातील पालिका कर्मचाऱ्यांना आमदार प्रशांत ठाकूर साहेबांच्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तू देण्यात आल्या.

## अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवले

**पनवेल : वार्ताहर**

एका १६ वर्षीय मुलीला अज्ञात आरोपीने फूस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

आरना पारधी (वय १६) असे या अल्पवयीन मुलीचे नाव असून तिची उंची पाच फूट, रंग गोरा, चेहरा गोल, बांधा मजबूत, केस काळे, नाक सरळ असून अंगात निळा टॉप व करडी लेगीस पॅन्ट घातलेली आहे. सोबत मोबाईल फोन आहे.

या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेलचा राजा चिंतामणीचे ढोल ताशाच्या गजरात आगमन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचा राजा चिंतामणीचे १७ ऑगस्ट रोजी ढोल ताशांच्या गजरात पनवेल–नवीन पनवेलमध्ये स्वागत करण्यात आले. या वेळी अवघी तरुणाई बाप्पांच्या स्वागताला तयार झाली होती.

१७ ऑगस्ट रोजी पनवेलचा राजा चिंतामणीचे वाजत गाजत आगमन करण्यात आले. यावेळी ढोल ताशांच्या गजरात बाप्पांचं स्वागत करण्यात आले. बाप्पा येण्यापूर्वी पनवेल मध्ये पाऊस पडत होता मात्र बाप्पाचे आगमन झाल्यानंतर जणू काही बाप्पांनी पावसालाही थांबवलं. बापांच्या स्वागताला तरुण, पुरुष, महिला, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बाप्पांचं स्वागत मोठ्या भक्ती पूर्ण वातावरणात करण्यात आले.

अनेकांनी चिंतामणी बाप्पाला आपल्या मोबाईल मधील कॅमेरा कैद केले. मोठ्या उत्साहात, जल्लोषात, आनंददायी वातावरणात पनवेलचा राजा चिंतामणीचे स्वागत करण्यात आले. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून चिंतामणी सेवक प्रयत्न करत होते. वाहतूक पोलीस देखील त्यासाठी तैनात होते. बाप्पांच्या आगमनाला हजारो भाविक उपस्थित राहून त्यांनी वाजत गाजत मिरवणूक काढत बाप्पांना इच्छितस्थळी नेले.



## पनवेलच्या पुरातन लक्ष्मी–नारायण मंदिरात कृष्ण जन्मोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेलिब्रेटीचे डान्स, लाखो रुपयांच्या उंच हंड्या, आणि नेत्यांची गर्दी म्हणजे आजचा दहीहंडी उत्सव. अशा ग्लॅमरसच्या जमान्यात पनवेलच्या पुरातन लक्ष्मी नारायण मंदिरात १०४ वर्षाची परंपरा जपून श्रीकृष्ण जन्मोत्सव पारंपारिक पध्दतीने शाडूच्या मूर्तिची प्रतिष्ठापना करून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

पनवेलच्या प्रभू आळीतील सिकेपी समाजाच्या १५० वर्षा पेक्षा जुन्या लक्ष्मी–नारायण मंदिरातील श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे हे १०४वे वर्षे असून येथील वैशिष्ट्य म्हणजे येथे मंदिरात शाडूच्या श्रीकृष्णाच्या मूर्तिची प्रतिष्ठापना केली जाते. पनवेलमधील कुंभार आळीतील एकाच कुटुंबाकडून ही मूर्ती आणली जात आहे. यावर्षी मूर्तिची विधिवत प्रतिष्ठापना शुक्रवारी सायंकाळी श्री व राजीव देशपांडे यांचे हस्ते करण्यात आली. १६ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला.



या वेळी बालगोपाळाला पाळणा श्री. व सौ. प्रणव ताम्हाणे यांनी घातला. वैशाली कुळकर्णी, कविता चित्रे, गौरी राजे, निलीमा गडकरी, संपदा देशपांडे, स्मिता चित्रे व स्नेहश्री महिला मंडळाच्या सदस्यांनी पाळणा म्हटला. त्यानंतर सुंठवडा आणि आणलेला प्रसाद उपस्थितांना वाटण्यात आला.

कालाष्टमीला मंदिरात दोन हंड्या बांधण्यात येतात त्यापैकी एक हंडी फोडण्याचा मान प्रभू आळीचा आहे. सायंकाळी महाप्रसाद होतो. पूर्वी समाजातील कुटुंबाकडून धान्य गोळा करून महाप्रसाद केला जात असे आता संस्था खर्च करते. समाजातील कोणाचे त्या वर्षात निधन झाले असल्यास त्याच्या घरी जिलेबी आणि प्रसाद नेऊन दिला जात असे पण आता शहराचा विस्तार झाल्याने ही प्रथा बंद करण्यात आली आहे. महाप्रसाद मंदिरातच होतो. त्यानंतर सायंकाळी मूर्तीचे विसर्जन करण्यात येते.

यावर्षी गोकुळाष्टमीचा उत्सव साजरा करताना संस्थेने सकाळी लहान मुलांसाठी चॉकलेट्स दहीहंडी व समाजातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा व उल्लेखनिय कामगीरीसाठी मान्यवरांचे हस्ते गौरव केला. या वेळी चांद्रसेनिय कायस्थ प्रभु युवा मंच व योगेश राजे, गिरीश गडकरी, श्रीकृष्ण चित्रे, संदीप देशमुख, मिलिंद देशपांडे, महेश कर्णिक, क्रांतीकुमार कुळकर्णी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाथी मेहनत घेतली उपस्थित होते.

## संपादकीय

# सावधगिरीची गरज

कोकण, मुंबई व मराठवाड्यासह जवळपास संपूर्ण राज्यभराला सोमवारी जोरदार पावसाने झोडपल्याने अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाल्याचे दिसले. हवामान विभागाने मंगळवारकरिताही मुंबई, ठाणे, रायगड, पालघर व नाशिक घाटपरिसरासाठी रेड अलर्ट जारी केल्याने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तर सतर्क राहीलच. पण अशा परिस्थितीत नागरिकांनीही स्वत:च्या सुरक्षिततेची खबरदारी घेण्याची गरज आहे.

**गेली काही वर्षे सातत्याने महाराष्ट्राला नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो आहे. कधी अवकाळी तर कधी अतिवृष्टी यांच्या तडाख्यात राज्यातील शेतकरी सातत्याने सापडतो आहे. यंदाच्या पावसाळ्यात उत्तरेतील काही राज्यांमध्ये ढगफुटीचे धडकी भरवणारे रौद्ररूप आपण पाहिले आहे. असाच ढगफुटीसदृश पाऊस नांदेडच्या मुखेड परिसरात सोमवारी झाल्याचे समजते. यामुळे त्या भागात हजारो हेक्टर शेतीचे नुकसान झाले असून सुमारे दीडशे जनावरे दगावल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला व निवारा केंद्रांतील नागरिकांना भोजन, शुद्ध पाणी, पांघरुण आदी सोयी प्राधान्याने देण्याचे निर्देश दिले. राज्यात रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये अधिक पावसाची नोंद झाली. मराठवाड्यात पावसाशी संबंधित घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाल्याचे समजते. मंगळवारीही मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता ध्यानात घेऊन मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई महापालिका तसेच रायगड जिल्ह्यातही जिल्हा प्रशासनाकडून शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. परिस्थिती लक्षात घेऊन ठिकठिकाणच्या जिल्हा प्रशासनांना व पालिकांना अशी सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळतो आहे. जिल्ह्यातील सावित्री, अंबा आणि कुंडलिका या तीन नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने प्रशासनाकडून जिल्ह्यात सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे सहा दरवाजे सोमवारी उघडण्यात आले. जिल्ह्यातील २८ धरणांपैकी २४ धरणे शंभर टक्के भरली असून त्यामधून सध्या विसर्ग सुरू करण्यात आला आहे. एकंदरच कोकणात नदीकाठची गावे पुराच्या पाण्याच्या विळख्यात आल्याने नदी किनारी राहणाऱ्या लोकांनी सावध राहण्याची गरज आहे. यासोबतच पोलादपूर तालुक्यातील ५२ दरडप्रवण गावांतील लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करण्याची गरज आहे. तुफान पावसामुळे महाड तालुक्यातील काही गावांचा संपर्क सोमवारी तुटला होता. तर रत्नागिरी, खेडमध्ये जगबुडी नदीने धोक्याची पातळी सोमवारी ओलांडली. अविरत कोसळणाऱ्या पावसामुळे पुराचा गंभीर धोका निर्माण झाला असून नागरिकांनी घाबरून न जाता वेळीच आवश्यक सामग्रीसह सुरक्षित स्थळी जाण्याची खबरदारी घेतली पाहिजे. मराठवाड्यातही अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. नद्यांच्या पुराचे पाणी शेतात शिरल्याने हजारो हेक्टर जमिनींवरील पिके पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. सोमवारी मुंबई व नवी मुंबईलाही पावसाचा फटका बसला. जोरदार पाऊस व भरतीची वेळ एक झाल्याने मुंबईत चेंबूर, वडाळा, किंग्ज सर्कल, दादर हिंदू कॉलनी येथे पाणी साचले. तर नवी मुंबईत एपीएमसीत रस्त्याला नदीचे स्वरुप आलेले दिसले. लोकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. एकंदर परिस्थिती पाहता, मंगळवारी रेड अलर्ट असलेल्या मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, नाशिक घाटपरिसरात नागरिकांनी महत्त्वाचे काम असल्याखेरीज घराबाहेर न पडणेच उचित ठरेल.**

# गणा धाव रे.. मला पाव रे.. पारंपरिक लोककलांना जनाधार





महाराष्ट्राला लोककलेची मोठी परंपरा लाभली आहे. विशेषत: कोकणात दशावतारी नाटक, शक्तीतुरा, डबलबारी, भजन, कीर्तन आणि जाखडी नृत्य किंवा बाल्या नाच या लोप पावत चाललेल्या लोककलांना पुन्हा सुगीचे दिवस येतांना आहेत. गणेशोत्सवा निमित्त रायगड जिल्ह्यात गावा-गावात लोककलांची रंगित तालीम सुरू झाली आहे.

श्रावणात महिलांचे मंगळगौरी खेळ, भाद्रपद महिन्यात गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यामध्ये कोकणात या लोककला प्रत्येक गावात सादर होत असतात. मात्र सध्या नोकरीनिमित्त शहराकडे आलेला चाकरमानी या कलेपासून दुरावला आहे. म्हणूनच सुधागड तालुक्यातील श्री दत्त गुरु नाच मंडळ यांचा जाखडी नाच २२ वर्ष बंद होता. मात्र येथील नवतरूण मुलांनी तो परत चालू केला आहे. ही कोकणातील लोककला जिवंत ठेवण्यासाठी हे मंडळ तत्पर आहे.

चव्हाणवाडी ग्रामस्थ मंडळाने २२ वर्षांनी जाखडी नृत्याची जमवाजमव सुरू केली आहे. पारंपरिक जाखडी नृत्याचा बाळकूम येथील मरू आईच्या मंदिरात शुभारंभ करण्यात आला. आता दर शनिवार-रविवार या मंडळाची रंगित तालिम येथे सुरू असते. विशेष म्हणजे गावच्या तरुण मंडळींचा या नृत्यात मोठा सहभाग असतो. तर ठाणे आणि भिवंडीमध्ये पुंडलिकबुवा मोरे यांच्या माध्यमातून नवीन होतकरू कलाकार मंडळींना तेजस मोरे आणि सौजस मोरे हे लोकसंगिताचे धडे देत आहेत.

गावची कलाकार मंडळी फावल्या वेळात जाखडी नृत्य, शक्ती तुरा, भजन कीर्तन यात दंग होत आहेत. खरंतर लोककला जपणे आणि आपली संस्कृती टिकवणे यासाठी ही मंडळी अहोरात्र मेहनत घेतात. विषेश म्हणजे त्याच्यात मुलींचासुद्धा सहभाग आहे.

**भजन, कीर्तन, प्रवचन आणि लोकसंगीताची मेजवानी**

जशी आषाढी वारी जवळ आली की वारकऱ्यांना पंढरपूरची ओढ लागते तसे गणपती जवळ आले की या कलावंताना जाखडीची चाहुल लागते. जाखडी नृत्य, कलगीतुरा, शक्तीतुरा याच्यासोबत गावागावात देवाचं जागरण करण्यासाठी अनेक मंडळांमध्ये भक्ती संगीताचा सुर आळवला जातो. भजन, कीर्तन, प्रवचन आणि लोकसंगिताच्या कार्यक्रमांची मेजवानीही असते.

**समाजप्रबोधन आणि लोककलेचा प्रचार**

ठाण्यातील श्री बल्लाळेश्वर प्रासादिक भजनी मंडळाच्या माध्यमातून पुंडलिक बुवा मोरे आणि त्यांची दोन मुलं सुप्रसिद्ध ढोलकीपटु तेजस मोरे आणि बालशाहीर सौजस मोरे हे लोककलेच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करीत आहेत. त्यांच्या कार्यक्रमांना ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ते संभाजीनगर, बीड, अहिल्यानगर येथेही कार्यक्रमांसाठी निमंत्रित केले जाते. तेजसची सुरेल ढोलकीची थाप आणि सौजसचा मधुर आवाज छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडा, शाहीर अण्णाभाउ साठेंच्या ऋमाझी मैना गावाकडं राहिली’ ते गण-गौळण, भारुड अशा विविध कार्यक्रमांतून समाजप्रबोधन आणि लोककलेचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्रभर पोहोचविण्याचे कार्य केले जात आहे

पारंपरिक बाल्या व माळी नाचाची धूम: बाल्या व माळी नाच हा ग्रामीण पारंपारीक नृत्य प्रकार विलुप्त होण्याच्या मार्गावर आहे. याला जाखडी नृत्य देखील म्हणतात. मात्र पूर्वजांकडून मिळालेली ही पारंपारीक नाचाची कला जिवंत ठेवण्यासाठी जिल्ह्यातील विविध ठिकाणी गणेशोत्सव इतर सणांना बाल्या व माळी नाच सादर केला जातो. नाचण्याचा विशिष्ट व आकर्षक ठेका व लय, कपड्यांचा वेगळेपणा आणि काळजाला भिडणारी पारंपारीक, प्रबोधनात्मक गाणी व संगीत यामुळे अनेक वर्षांपासून बाल्या व माळी डांस खुप लोकप्रिय आहे.

पारंपरिक लोककला टिकवण्यासाठी तरुणांचा पुढाकार : आधुनिकतेच्या युगात समाजामध्ये बाल्या नाच आणि माळी नाचाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. तरुण पिढीने याकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे ही लोककला आता लोप पावत चालली आहे. आपल्या पुर्वजांची हि कला टिकावी, तिचे जतन व्हावे यासाठी पेण तालुक्यातील दुरशेत गावातील सुशिक्षीत तरुण मागील अनेक वर्षापासून स्वतः हि कला सादर करुन जोपासत आहेत. यातील अनेक तरुण पदवीधर आहेत तर कोणी इंजिनियर देखिल आहेत. मात्र प्रत्येकजण तनमनधनाने कोणताही संकोच न बाळगता हि कला सादर करतात व त्यासाठी मेहनत घेत आहेत.

आपल्या भावी पिढीला ही कला समजावी व त्यांनी देखील हि पारंपरिक कला अधिक समृद्ध करावी यासाठी आपली वैयक्तिक जबाबदारी म्हणून मागील १५ वर्षांपासून बाल्या व माळी नाच ही कला जतन करत आहोत. गावातील सर्व ग्रामस्त आम्हाला प्रोत्साहन देवून सहकार्य करतात. पारंपारीक कला टिकावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. गणेशोत्सव निमित्त सराव सुरू केला असल्याचे पेण तालुक्यातील येथिल तरुण कलाकार, समाधान म्हात्रे यांनी सांगितले

**-गौसखान पठाण**

# अभिनयाची जादू दाखवणारे उत्पल दत्त



भारतीय रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील उत्पल दत्त यांचे योगदान पूर्णपणे ओळखले गेलेले नाही. देशभरातील लोक त्यांना प्रामुख्याने त्यांच्या प्रसिद्ध हिंदी चित्रपटांमुळे ओळखतात जिथे त्यांनी बासू चॅटर्जी आणि हृषिकेश मुखर्जी आणि इतर अनेक चित्रपटांमध्ये त्यांच्या अद्वितीय विनोदी शैलीसह सुसंस्कृत पात्र रेखाटने सादर केली. जरी त्यांच्या चित्रपटांमध्ये यशस्वी मुख्य प्रवाहातील आणि मुख्य प्रवाहाबाहेरील चित्रपटांचा समावेश असला तरी, रंगभूमीचे जग त्यांना एक थिएटर अभ्यासक, लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार म्हणून चांगले ओळखते. मानवांमधील आणि त्यांच्यातील अस्थिर आणि चढउतार असलेल्या संबंधांच्या अटींवर वाटाघाटी कराव्या लागणाऱ्या राजकीय नीतिमत्तेचा विचार न केल्यास रंगभूमी अर्थपूर्ण असू शकत नाही यावर त्यांनी कधीही भर दिला नाही.

दत्त यांचा जन्म २९ मार्च १९२९ रोजी झाला आणि त्यांनी कोलकाता येथील सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. रंगभूमी ही त्यांची कायमची आवड होती. त्यांनी १९४७ मध्ये 'द शेक्सपियरियन्स' या त्यांच्या गटाची स्थापना केली . त्यांचा पहिला कार्यक्रम रिचर्ड तिसरा यांचा एक शक्तिशाली निर्मिती होता, ज्यामध्ये दत्त राजाची भूमिका साकारत होते. त्यांनी प्रवासी शेक्सपियराना थिएटर कंपनीचे जेफ्री आणि लॉरा केंडल यांना इतके प्रभावित केले की त्यांनी त्यांना ताबडतोब कामावर ठेवले. त्यांनी त्यांच्यासोबत भारत आणि पाकिस्तानमध्ये दोन वर्षांचे दौरे केले, ज्यामध्ये शेक्सपियरची भूमिका साकारली, पहिले १९४७-४९ आणि नंतर १९५३-५४. ओथेलोच्या मुख्य भूमिकेतील त्यांचे पात्र इतके आश्चर्यकारक होते की अनेक वर्षांनंतर त्यांना सप्तपदी (१९६१) या प्रसिद्ध चित्रपटात उत्तम कुमार यांनी साकारलेल्या ओथेलोच्या भूमिकेसाठी आवाज देण्याची विनंती करण्यात आली होती १९ ऑगस्ट १९९३ रोजी दत्त यांचे कलकत्ता येथे निधन झाले. (साभार : इंटरनेट )




## ओप्पो रेनो १४ एआयच्या फीचर्समुळे फोटो एडिटिंग सोपे

टेक कंपनी ओप्पोने भारतात रेनो १४ लाँच केला आहे. यात एक शक्तिशाली कॅमेरा सेटअप, ६००० एमएएच बॅटरी, नवीनतम डायमेन्सिटी ८३५० चिपसेट, १२ जीबी रॅम आणि अनेक वैशिष्ट्ये आहेत.हा फोन ३७,९९९ ते ४२,९९९ रुपयांच्या किमतीत येतो.



सर्वप्रथम, डिझाइनबद्दल बोलायचे झाले तर, ओप्पो रेनो १४ मध्ये मेटल फ्रेम आहे. हा फोन ७.४२mm पातळ आहे आणि त्याचे वजन १८७ ग्रॅम आहे. यात मखमली टेक्सचर ग्लास बॅक आहे, जो हातात धरल्यावर प्रीमियम फील देतो आणि त्यावर फिंगरप्रिंट देखील दिसत नाहीत. रंग पर्याय पर्ल व्हाइट आणि फॉरेस्ट ग्रीन आहेत.

डिस्प्लेचे बेझल १.६ मिमी अल्ट्रा-थिन आहेत, जे बरेच पातळ आहे. मफोन आयपी६८ आणि आयपी६९ वॉटर-डस्ट रेझिस्टन्स रेटिंगसह येतो, म्हणजेच तो धूळ, पाणी आणि उच्च पाण्याच्या दाबापासून सुरक्षित असेल.

**ओप्पो रेनो १४: स्पेसिफिकेशन्स**

डिस्प्ले: ओप्पो रेनो १४ मध्ये ६.५९-इंचाचा फ्लॅट एमोलेड स्क्रीन आहे. तो २७६० x १२५६ पिक्सेलच्या FHD+ रिझोल्यूशनला सपोर्ट करतो. डिस्प्ले १२०कूरिफ्रेश रेट आणि १२०० निट्सच्या पीक ब्राइटनेससह येतो, ज्यामुळे स्क्रोलिंग आणि व्हिज्युअल अनुभव सहज आणि तेजस्वी होतो.

परफॉर्मेंस: ओप्पो रेनो १४ **५जी** फोनमध्ये MediaTek चा नवीन Dimensity ८३५० चिपसेट आहे, जो ४पा प्रक्रियेवर बनवलेला आहे आणि 3GHz पर्यंत क्लॉक स्पीड देतो. या चिपसेटने १.४ दशलक्ष पेक्षा जास्त स्कोअर मिळवले आहेत, याचा अर्थ ते मध्यम श्रेणीच्या कामगिरीसाठी चांगले आहे. याच्या मदतीने, PUBG सारखे गेमिंग आणि मल्टीटास्किंग सहजपणे करता येते, परंतु हेवी गेममध्ये ते थोडे गरम होऊ शकते.

कॅमेरा: रेनो १४ मध्ये ट्रिपल रियर कॅमेरा सेटअप आहे. यात ५० एमपी सोनी प्रायमरी सेन्सर ओआयएस सह येतो. यात ८ एमपी अल्ट्रा-वाइड सेन्सर आणि ५० एमपी जेएन५ पेरिस्कोप टेलिफोटो लेन्स देखील आहे, जो ३.५ ऑप्टिकल झूमला सपोर्ट करतो. त्याच वेळी, सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी ५० एमपी कॅमेरा देण्यात आला आहे.

# इंजिनीअर ते इन्फोसिसच्या सर्वेसर्वा सुधा मूर्ती

भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील भारतातील प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती यांनी संगणक शास्त्रज्ञ आणि अभियंता म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्या इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा आणि गेट्स फाउंडेशनच्या सार्वजनिक आरोग्य सेवा उपक्रमांच्या सदस्या आहेत. त्यांनी अनेक अनाथाश्रमांची स्थापना केली, ग्रामीण विकासाच्या प्रयत्नांमध्ये भाग घेतला आहे. कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना कॉम्प्युटर आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या चळवळीला पाठिंबा दिला आणि हार्वर्ड विद्यापीठात द मूर्ती क्लासिकल लायब्ररी ऑफ इंडियाची स्थापना केली.

मूर्ती यांनी कर्नाटकातील सर्व शाळांमध्ये संगणक आणि ग्रंथालय सुविधा सुरू करण्यासाठी एक धाडसी पाऊल उचलले आणि कॉम्प्युटर सायन्स शिकवले. मूर्ती या त्यांच्या सामाजिक कार्यासाठी आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील साहित्यातील योगदानासाठी ओळखल्या जातात. डॉलर बहू ही कादंबरी त्यांनी मूळ कन्नडमध्ये लिहिली आणि नंतर डॉलर बहू म्हणून इंग्रजीमध्ये अनुवादित केली, झी टीव्हीने २००१ मध्ये टेलिव्हिजन नाटक मालिका म्हणून रुपांतर केले. मूर्ती यांनी मराठी



**निमित्त**

चित्रपट पितृरूप आणि कन्नड चित्रपट प्रेरणामध्येही काम केले आहे

सुधा मूर्ती यांचा जन्म १९ ऑगस्ट १९५० रोजी झाला.कर्नाटकातील शिगगाव येथे सर्जन डॉ आर एच कुलकर्णी आणि त्यांची पत्नी विमला कुलकर्णी यांच्या त्या कन्या आहेत. आणि त्याच्या भावंडांचे संगोपन आई-वडील आणि आजी-आजोबांच्या घरात झाले.मूर्ती यांनी बी.व्ही.बी. कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीमधून (आता घडए टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी म्हणून ओळखले जाते), बी.ई. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग पूर्ण केले. पहिला क्रमांक मिळविल्याने कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून सुवर्णपदक देऊन त्यांना गौरविण्यात आले. मूर्ती यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून कॉम्प्युटर सायन्समध्ये एमई पूर्ण केले. तेथेही त्यांनी अव्वल स्थान पटकावले आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगमधून सुवर्णपदक मिळवले.

सुधा मूर्ती यांची कारकीर्द

सुधा मूर्तींच्या कारकिर्दीच्या सुरुवातीबद्दल बोलायचे झाले तर, भारतातील सर्वात मोठी वाहन उत्पादक कंपनी टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह कंपनी मध्ये नियुक्त केलेल्या त्या पहिल्या महिला अभियंता ठरल्या. मूर्ती पुण्यात विकास अभियंता म्हणून कंपनीत रुजू झाल्या आणि नंतर मुंबई आणि जमशेदपूरमध्ये त्यांनी काम केले. मूर्ती यांनी कंपनीच्या अध्यक्षांना पत्राद्वारे टेल्कोमध्ये फक्त पुरुष लिंगभेदाची तक्रार केली. त्यानंतर त्यांना ताबडतोब नोकरीवर घेण्यात आले. त्या नंतर पुण्यातील वालचंद ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजमध्ये वरिष्ठ प्रणाली विश्लेषक म्हणून रुजू झाल्या. सुधा मूर्ती यांनी १९९६ मध्ये इन्फोसिस फाऊंडेशन सुरू केले आणि आजपर्यंत इन्फोसिस फाउंडेशनचे विश्वस्त आणि बंगळुरू विद्यापीठाच्या पीजी सेंटरमध्ये व्हिजिटिंग प्रोफेसर आहेत. त्यांनी ख्रिस्त विद्यापीठातही अध्यापन अनेक पुस्तके लिहिली आणि प्रकाशित केली आहेत.(साभार - इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### काळी मिरीच्या सेवनाने १००० रोग होतात बरे!

काळी मिरी सलाड, कापलेली फळं, डाळ किंवा भाज्यांमध्ये वापरली जाते. घरगुती इलाजासाठीही तिचा वापर केला जातो. काळ्या मिरीमध्ये औषधी गुण आहेत. या काळी मिरीचे कोणते रामबाण उपाय आहेत. त्यावर आज प्रकाश टाकूया.



अर्धा चमचा काळी मिरीची पावडर तुपात टाकून रोज सकाळी आणि संध्याकाळी खाल्ल्यास नजर तेज होते. दृष्टीदोष दूर होण्यास मदत होते.

काळी मिरीचे चार पाच दाणे, किशमिशचे १५ दाणे तोंडात टाकून चघळा. त्यामुळे खोकला दूर होतो. मधात काळी मिरीची पावडर टाकून तीन चार वेळा तिचं चाटण घेतल्यास खोकला थांबतो. काळी मिरी ही उत्तम अँटीऑक्सिडंट आहे. काळी मिरी अँटीबॅक्टेरिअलचं काम करते. मँगनीज आणि लोहासारख्या पोषक तत्त्वांचा तो चांगला स्त्रोत आहे. शरीराचं कार्य उत्तम ठेवण्यास त्याने मदत होते.

गॅस झाल्यावर पोट फुगल्यास काळी मिरी खा. त्यामुळे गॅसची समस्या दूर होते. काळी मिरीला सुईने छिद्र पाडा आणि ती आगीवर भाजा. त्यातून निघालेला धूर नाकाने शरीरात घ्या. हा प्रयोग केल्यास डोकेदुखी बंद होते. उचकी येणंही बंद होतं.

२० ग्रॅम काळी मिरी , जिरे १० ग्रॅम आणि साखर १५ ग्रॅम घेऊन त्याचं मिश्रण करा. त्यानंतर ते पाण्यात टाकून सकाळी संध्याकाळी घ्या. मूळव्याधापासून राम मिळेल.

पांढरी मिरी डोळे आणि कपाळासाठी उपयुक्त मानली जाते. पीठात देशी तूप घाला. त्यात थोडी साखर टाकून सफेद काळी मिरी पावडर टाका. आणि त्याचं सकाळी तसेच संध्याकाळी सेवन करा. त्वचेवर फोडं आले असतील तर काळी मिरीवर थोडं पाणी टाकून ती दगडावर घासा. त्यानंतर करंगळी बाजूच्या बोटाने फोडीवर ते मलम लावा, त्यामुळे फोडी गायब होते.

तुमचा रक्तदाब कमी होत असेल तर दिवसातून दोन तीन वेळा पाच दाने काळी मिरी आणि किशमिशचे २१ दाणे खा. काळी मिरी, हिंग, कापूर (सर्व पाच पाच ग्रॅम) यांचं मिश्रण बनवा. त्यानंतर राई एवढ्या गोळ्या बनवा. प्रत्येक तीन तासानंतर एक गोळी खाल्ल्यावर उलटी, दस्त बंद होतील.

सर्दी झाल्यावर काळी मिरीचे चार पाच दाणे वाटून एक कप दूधात गरम करून प्या. सकाळ संध्याकाळी हे दूध प्यायल्यास आराम मिळतो. काळ्या मिरीचा चहा घेतल्यावर सर्दी पडसे, खोकला आणि व्हायरल इन्फेक्शनपासून आराम मिळतो. काळी मिरीमुळे पाचन क्रियाही सुधारते.

# रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाने पूरपरिस्थिती

## महाडमध्ये नगरपालिकेने भोंगा वाजवून नागरिकांना केले सतर्क

**महाड : प्रतिनिधी**

दोन दिवस कोसळणाऱ्या पावसाचा जोर आज वाढला असून या मुसळधार पावसामुळे तालुक्यामध्ये पूरजन्य स्थिती निर्माण झाली आहे यामुळे नागरिकांमध्ये एकच घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील सर्वच नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे.

दोन दिवस या संततधार पावसामुळे महाड तालुक्यातील सावित्री, गांधारी, काळ या नद्या ओसंडुन वाहू लागल्या आहेत. यामुळे महाड तालुक्यातील कांही रस्ते पाण्याखाली गेले आहेत. पुलांवरून वाहणाऱ्या पाण्यामुळे गावांचा संपर्क देखील तुटला आहे. शहरातील गांधारी पूल देखील पाण्याखाली गेला असून येथील रस्ता बंद करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे क्रांती स्तंभाजवळ देखील पुराचे पाणी



शिरले आहे दस्तुरी नाका ते नातेखिंड हा रस्ता देखील पाण्याखाली गेल्यामुळे वाहतुकीस बंद ठेवण्यात आला आहे त्याचप्रमाणे महाड रायगड रस्त्यावरील वाहतूक देखील बंद झाली होती. सांदोशी गावाजवळ देखील पुलावरून पाणी गेले.

पूर परिस्थिती जाणवू लागल्यानंतर महाडमध्ये नागरिक आणि व्यापारी यांच्यात चांगलीच घबराट निर्माण झाली. तालुक्यातील अनेक शाळा देखील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव अर्ध्यातून सोडण्यात आल्या. दरम्यान मौजे वरंध, धरणवाडी येथील अर्जुन धनावडे यांच्या घराची भिंत झालेल्या पावसामुळे कोसळली असून अंशत नुकसान झाले आहे यामध्ये कोणतीही जीवित हानी झालेली नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## मुरूडमध्ये धरणे तुडूंब भरली

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात सध्या जोरदार पाऊस सुरु असून आतापर्यंत जून महिन्यापासून १५७८ मिलीमीटर पाऊस बरसला आहे.मागील चार दिवसापासून सलग पाऊस सुरु असून दररोज ९० ते ८० मिलीमीटर पाऊस पडत असल्याने जनजीवन विस्कळीत होऊन सर्वत्र पाणीच पाणी दिसत आहे.तलाव ,धरणे,विहिरी तुडुंब भरल्या असून सर्वत्र पाणी वाहून जात आहे.

धरणात पाणी साठल्याने लोकांना पोहण्याचा आनंद रोखता येत नाही.आंबोली

### पाणीचिंता मिटली

धरणावर लोक मनसोक्त पोहण्याचा आनंद लुटत आहेत.मे महिन्याचा सुरुवातीच्या काळात पाऊस किमान ५१६ मिलीमीटर बरसला होता.परंतु तो पाऊस मे मध्ये पडल्याने शासकीय यंत्रणेत हा पाऊस मोजला जात नाही.१ जून पासूनच पावसाची मोजदाद मिलीमीटर मध्ये धरली जात असते.

मुरुड शहरात गेले चार दिवस पावासाच्या जोरदार बॅटिंगमुळे मार्केट मध्ये सामसूम पाहायला मिळत आहे. बुधवारपासून सुरु झालेला पाऊस आज पर्यंत सुरू आहे. गेले चार दिवसांपासुन २९६ मिमि पाऊस पडला अशि माहिती मुरुड तहसीलदार कार्यालयाकडुन देण्यात आली आहे.व्यावसायिकांची चिंता वाढणारी आसली तरी शेतकरी मात्र सुखावला आहे.सतत धार पावसामुळे बाजारपेठ ओस पडल्या असून कोणताही ग्राहक खरेदीसाठी येत नाही.सध्या बाजारपेठेमध्ये शुकशुकाट पहावयास मिळत आहे.पावसाचे प्रमाण वाढल्याने मासेमारी ठप्प झाली असून सर्वजण पाऊस थांबण्याची वाट पहात आहेत.



## निजामपूरसह माणगाव तालुक्यात पावसाचे थैमान



**माणगाव : तालुक्यात सोमवार रोजी सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले. या पावसामुळे काही ठिकाणी दरडी कोसळून वाहतुकीचे रस्तेसुद्धा बंद झालेले आहेत. अनेक गावातील लोकांना माणगाव शहराकडे येण्याचा संपर्क तुटला आहे.**

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव तालुक्यात सोमवार दि. १८ ऑगस्ट रोजी सर्वत्र मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. सर्वत्र पाणीच पाणी होऊन तालुक्यातील शेकडो गावातील लोकांना माणगाव शहराकडे येण्याचा संपर्क तुटला आहे.

तालुक्यातील अनेक गावातील रस्ते पाण्याखाली गेले असून माणगाव शहरात सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. शहरातून जाणाऱ्या काळ नदीची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तिने धोक्याची पातळी ओलांडली आहे. निजामपूर भागात रात्रीपासूनच पावसाने थैमान घातले असून या भागातील नदी, नाले, ओढे इतकेच नाही तर शेतातील खांडीने सुद्धा रुद्रावतार



घेतले असून सर्वत्र महापुराचे स्वरूप दिसून येत आहे. त्यामुळे दळणवळणाच्या समस्येमुळे वाहतुकीचा सर्वत्र फज्जा उडाला असून नोकरदरांसह धंदा – व्यवसायांकिना याचा फटका बसला

## तळा तालुक्यात जनजीवन विस्कळीत

**तळा : प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांपासून तळा तालुक्यात पावसाची जोरदार बॅटिंग चालू असून या संततधार पडणाऱ्या पावसाने जनजीवन विस्कळित झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

दोन दिवसांपासून सतर्कतेचे आवाहन करण्यात येत आहे पाऊस जोराचा पडत असल्याने नागरिकांना घरातून बाहेर पडणे ही कठीण होतं आहे .संपूर्ण तळा तालुक्यात जनजीवन विस्कळित



झाल्याचे चित्र पहावयास मिळत असून बाजारपेठेत शुकशुकाट होता.तालुक्यतील पढवणपुल,महागाव पुल या पुलावरून पाणी वाहून जात असल्याने काही काळ वहातुक ठप्प झाली होती.व पुन्हा पुलांवरील पाणी कमी झाल्यानंतर वाहतूक पुर्ववत झाली.पढवण पुलावरून ही पाणी वाहत असल्याने वहातुक ठप्प झाली होती.पाणी कमी झाल्यानंतर वाहतूक पुर्ववत झाली.

## रोह्यात कुंडलिका नदीने धोका पातळी ओलांडली



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात दिवसभर मुसळधार पाऊस पडला आहे. त्यामुळे तालुक्यातील नदी नाले तुंडुब भरून वाहत आहेत. सकाळी शाळेत जाणारे विद्यार्थी व कंपनीत कामाला जाणारे कामगारांना त्याचा फटका बसल्याचे दिसून आले. सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. संपूर्ण वातावरण काळोखमय झाल्याचे दिसून आले. रोहा नजीक असलेल्या भुवनेश्वर गावातही काही ठिकाणी पाणी आल्याचे दिसून आले.मुंबई गोवा महामार्गावरील आंबेवाडी नाक्यावर सुद्धा पाणी आल्याने आंबेवाडी नाक्यावरील दुकानात पाणी शिरल्याचे चित्र दिसून येत आहे



## श्रीवर्धन तालुक्यात अतिवृष्टीमुळे रस्ते गेले पाण्याखाली

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये जोरदार पर्जन्यवृष्टी होत आहे. मात्र रविवारी रात्रीपासून पावसाचा जोर वाढल्याने, श्रीवर्धन तालुक्यात अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली पाहायला मिळाली. श्रीवर्धन शहरातील अनेक रस्ते पाण्याखाली गेले होते. भैरवनाथ मंदिर परिसर, शाळा क्रमांक दोन च्या समोरील रस्ता, त्याचप्रमाणे पेशवे आळी येथील रस्ता पूर्णपणे पाण्याखाली गेला होता. संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यामध्ये सुद्धा पावसाची अशीच स्थिती असल्याने, बहुतांश नदी नाले तुडुंब भरून वाहत असल्याचे दिसत होते.

## खालापूर तालुक्यातील धरणे ओव्हरफ्लो

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील धरणे ओव्हर फ्लो, नदी नाले ओसंडून वाहू लागली आहेत. सतत पडणाऱ्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून जनजीवन ऐवजी जलजीवन सुरू झाल्याची चर्चा आहे,

सतत पडणाऱ्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतीचे नुकसान मोठ्या प्रमाणावर दिसत आहे .शेतीने तळ्याचे रूप धारण केले आहे. खालापूर तालुक्यात भिलवले,कलोते, डोनवत आणि खरसुंडी वळण



बंधारा आहे, ही धरणे पाटबंधारे विभाग यांची आहेत. ही धरणे तुडुंब भरल्याने वाहत आहेत. तसेच गावागावांतील तलाव,विहिरी पूर्णपणे भरली आहेत. जनजीवन पूर्णपणे विस्कळीत केले असून, बाजारहाट, करण्यास जाणे सुद्धा कठीण झाले आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल पिनकोड – ४९० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२– २७४५२७७८ फॅक्स ०२२–२७४६७४४०

**ई–कार्यप्रणाली अंतर्गत ई–निविदा क्र. १८ ( ई–निविदा) सन २०२५–२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप –** या निविदेमध्ये एकूण ०३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १८.०८.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक २५.०८.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

क्र. आर.ओ.सी.२०२५–२६/
क्र.५/सी २१६५
दिनांक :– १८/०८/२०२५

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या स्थावर मिळकती या १) श्री. असित विष्णू वाणी, २) श्री. सतिष विष्णू वाणी, ३) श्री. सुधीर यशवंत वाणी, ४) श्री. नितीन यशवंत वाणी आणि ५) श्री. रविंद्र यशवंत वाणी यांच्या मालकी हक्कांतील, ताबे कब्जातील आणि महसूल दप्तरी त्यांच्याच नावे नोंदविलेल्या आहेत. सदरहू मिळकतीचे महसूल दप्तरातील वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - पनवेल, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड येथील**
**पनवेल महानगर पालिका हद्दीतील**

| अ. क्र. | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र चौ. मीटर |
|---|---|---|
| १ | १२१६ | २६.८० |
| २ | १२१७/१ | ३.३० |
| ३ | १२१७ /D | ९७.०० |
| ४ | १२१७/E | ७५.२० |
| ५ | १२१८/A | १०१.२० |
| ६ | १६९३ | ९२.०० |
| | एकूण क्षेत्र | ३९५.५ |

वरनमुद मिळकतींमधील मालकांचे हक्क, हितसंबंध आणि अधिकार हे कधीही रद्द न होणारे, निर्वेध आणि बोजाविरहीत आहेत, तसेच वर नमुद मिळकतींसंबंधात मालकांनी कधीही कोणासोबत कोणत्याही प्रकारचा लेखी अथवा तोंडी करार केलेला नाही, तसेच वरनमुद मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क इ. हक्क हितसंबंध नसल्याचे, वरनमुद मिळकतींसंबंधात कोणत्याही न्यायालय आणि अधिकारी यांचे समोर कोणत्याही प्रकारचा वाद प्रलंबित नसल्याचे, वर नमूद मिळकती केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी संपादीत केलेली नसल्याचे, तसेच वरनमुद मिळकती विद्यमान मालकास विक्री करण्याचा कायदेशीर हक्क व आधिकार असल्याचा विश्वास विद्यमान मालकाने आमचे आशिलांस दिलेला आहे.

सदर विश्वासावर विसंबून वरनमुद मिळकर्ती आमचे आशिलांनी खरेदीखताने मालक १) श्री. असित विष्णू वाणी, २) श्री. सतिष विष्णू वाणी, ३) श्री. सुधीर यशवंत वाणी, ४) श्री. नितीन यशवंत वाणी आणि ५) श्री. रविंद्र यशवंत वाणी यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

अशा परिस्थितीमध्ये वरनमुद मिळकतींमध्ये मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास वर नमूद मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा असल्यास संबंधीताने तो स्वेच्छेने जाणिवपुर्वक सोडून दिलेला आहे, असे गृहीत धरून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून आलेली तक्रार आमचे आशिलांवर बंधनकारक रहाणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल ,दिनांक : १९/०८/२५ **ॲड. अमेय विनायक सावळेकर**
**कार्यालय-** १७. गोल्डन ड्रीम आर्केड, एम.टी.एन.एल.शेजारी, पनवेल,जि. रायगड, ४१०२०६ **मो. क्र. - ९८१९०९०६४२.**

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**अग्निशमनविभाग**
**दरपत्रके मागविण्यास सूचना**

पनवेल महानगरपालिका खालील कामासाठी इच्छुक संस्था यांचेकडून जाहीर माहोर बंद दरपत्रके मागवित आहेत. इच्छुकांनी परिपुर्ण भरलेली अंदाज दरपत्रके सीलबंद करुन दिनांक १९/०८/२०२५ रोजी पासुन दिनांक २५/०८/२०२५ रोजी पर्यंत दु. ३.०० वाजेपर्यंत महापालिकेच्या अग्निशमन विभागात सादर करावीत. सदर तारखेनंतर प्राप्त झालेली कोणतीही दरपत्रक स्वीकारले जाणार नाही. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २६/०८/२०२५ रोजी उप आयुक्त यांच्या दालनात दरपत्रक धारक अथवा त्यांचे समक्ष सायं. ०४.०० वा. उघडणेत येतील.

| अक्र. | साहित्याचे वर्णन/कामाचे नाव | नग | दर प्रती नग | एकुण दर जी.एस.टी.सह |
|---|---|---|---|---|
| १ | MH 46 CL 6549 Fire Tender Ashok Leyland PA 1920 / 47H CC (Resue Vehicle ) या वाहनाचा विमा नुतनीकरण करणे. | १ | | |
| | **एकूण** | | | |

**अटी व शर्ती :–**
१) दुकान नोंदणी प्रमाणपत्र व GST, पॅनकार्ड नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) सर्व नमूद जीएसटी/व्हॅट/वाहतूक खर्च यांसह नमूद असावेत.
३) सदरकामी वापरण्यात येणारे साहित्य चांगल्या प्रतीचे वापरले जावे अन्यथा साहित्य स्वीकारले जाणार नाही.
४) याकामी निव्वळ दरपत्रके मागणी करीत असल्याने याबाबत कोणत्याही अटी सदरचा विभाग बांधिल असणार नाही.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३९३/४००/२०२५
दिनांक :– १८/०८/२०२५
ठिकाण :– पनवेल महानगरपालिका, पनवेल.

**सही/–**
**(कैलास गावडे)**
उपआयुक्त (मुख्यालय ।)
पनवेल महानगरपालिका

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**पशुवैद्यकीय विभाग**
कार्यालय :– देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेतील एरोड्रोम क्षेत्राच्या अनुषंगाने पक्षी व प्राण्यांचा धोका टाळण्याकरिता सल्लागार नेमणूक करणेकामी. इच्छुकांनी सदरचे निविदा दर दि. २८/०८/२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या, पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

| अ.क्र. | तपशील | ठेकेदाराचे द्यावयाचे दर (जीएसटी वगळता) |
|---|---|---|
| 1. | Bird Strike Hazards and its Mitigation Measures required in Aerodrome Area Under Panvel Muncipal Corporation Jurisdiction.<br>I. What are the factors attracting birds to the airfields.<br>II. Which are the bird species involved inconflicts with aircrafts?<br>III. What are the options available for habitat/ecosystem management to prevent the birds from air fields?<br>IV. General bird species composition at project site.<br>V. Local bird And Migratory Bird movement patterns between Aerodrom Areas and Runway areas.<br>VI.Identification of important roosting and nesting sites within Aerodrome Area under Pmc.<br>VII. Clearly Identify Factors in Aerodrome Areas leading to related aviation risk.<br>VIII. Suggesting mitigation Measures<br>IX. Quarterly Report (Bird Strike hazard risk & mitigation method) | |

**या कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–**
१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. पॅनकार्ड (संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे)
३. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतुक खर्चासह समाविष्ठ असावेत.
४. सदरची जाहीर सूचना फक्त दर खात्री करणे करीता मागविणेत येत आहे.
५. या कामी काही माहीती हवी असलेस पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधावा.
६. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर ई–निविदा मागविणेत येईल.
७. प्राप्त जाहीर निविदा सूचना दर स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समितीला असतील.

दिनांक : १८/०८/२०२५
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३९८/४०५/२०२५

**सही/–**
मा. उपायुक्त
पनवेल महानगरपालिक

# पनवेलच्या शाळांमध्ये गणेशमूर्ती कार्यशाळा

## बांठिया शाळेत पर्यावरणपूरक उपक्रमास प्रतिसाद




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन पनवेल येथील के.ए. बंठिया शाळा, नवीन पनवेल मध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या हेतूने शाडू मातीपासून गणपती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पनवेल महानगरपालिका व लिओ क्लब आणि लायन्स क्लब पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तसेच घरगुती गणेशोत्सवात शाडू मातीच्या गणेशमूर्तीची निवड कशी करावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे पर्यावरण विभागप्रमुख मनोज चव्हाण, कनिष्ठ अभियंता शुभम रौंदाळे, तसेच लायन्स क्लबच्या ज्योती देशमाने आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचे आवाहन केले. प्लॅस्टर ऑफ पॅरिसमुळे होणारे पाण्याचे प्रदूषण आणि त्याचा सागरी जीवसृष्टीवर होणारा दुष्परिणाम याची माहिती देत, शाडू मातीच्या मूर्तीमुळे पर्यावरणास हानी पोहोचत नाही यावर विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना मनोज चव्हाण यांनी सांगितले की, पर्यावरणपूरक सण साजरा करणे ही काळाची गरज आहे. समाजातील नव्या पिढीला याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. या कार्यशाळेमुळे विद्यार्थी स्वतःच्या घरात व समाजात शाडू मातीची मूर्ती बसविण्याचे संदेशवाहक ठरतील.

लायन्स क्लबच्या ज्योती देशमाने यांनी लायन्स कलबच्या उपक्रमांची माहिती देत समाजहितासाठी अशा कार्यशाळा सातत्याने घेण्याचे आश्वासन दिले, लिओ क्लब व लायन्स क्लबच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना एक वेगळा अनुभव मिळाला आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या दिशेने महापालिका एक महत्त्वाचे पाऊल उचलत असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनुसार घेण्यात आलेल्या या कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाडू माती हाताळून लहान गणेशमूर्ती तयार करण्याचा अनुभव घेता आला. शिक्षक, प्रशिक्षक आणि लायन्स क्लबच्या स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कलात्मकतेने व नवनवीन कल्पना वापरून मूर्ती साकारल्या. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता तर निर्माण झालीच, शिवाय गणेशमूर्ती तयार करण्याची एक वेगळी कलात्मक दृष्टीदेखील विकसित झाली.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त दिव्यांगांना व्हीलचेअरचे वाटप



**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्यदिनानिमित्त आरिन फाऊंडेशन आणि रोटरी क्लब मिलेनियम सिटी वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २८ येथे विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत १५ दिव्यांग मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमात आरिन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नितेश मिसाळ, फाऊंडेशनचे सदस्य तसेच रोटरी मिलेनियम सिटी क्लबच्या अध्यक्षा अर्चना चोरारिया, उपाध्यक्ष रमेश सोनवणे, सचिव अशोक शहा व क्लबचे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते. तसेच एस. के. कॉलेजच्या रोट्रॅक्ट क्लबच्या सदस्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी आर्यन् एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश म्हात्रे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या समग्र शिक्षण अभियान टीमच्या प्रमुख अनिता मोजाड, मनाली आंब्रे आलिया व रंजन इन्स्टिट्यूट, बांद्रा येथील दिव्यांग मित्र यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष सहकार्य केले. दिव्यांगांना मोफत व्हीलचेअर मिळाल्यानंतर त्यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे भाव उमटले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय सावंत सर यांनी केले, तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक अविनाश म्हात्रे यांनी केली. संपूर्ण नियोजनात शाळेच्या मुख्याध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# वीर वाजेकर महाविद्यालयात लायन्स क्लबची स्थापना




**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर आर्ट सायन्स कॉमर्स कॉलेजमध्ये लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पस या नावाने स्थापन झाला. या क्लबचा इन्स्टॉलेशन सोहळा नुकताच वीर वाजेकर महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला.

प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी पुढाकार घेऊन महाविद्यालयात क्लबची स्थापना केली. त्याची उद्दिष्टे नमूद करून सर्व मान्यवरांचे स्वागत केले. सदर सोहळ्याचे निमित्ताने वाशी लायन्स क्लबचे लायन विजय पाटील यांनी लायन्स क्लबची स्थापना, उद्देश व विस्तार याची सविस्तर माहिती दिली. पी एम एफ जे लायन मिलिंद पाटील उलवे जेम्स क्लबचे ॲडमिनिस्ट्रेटर यांनी लायन्स क्लबची कार्यपद्धती, हाती घेतलेले उपक्रम,विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांची माहिती दिली.याप्रसंगी लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पसची नवनियुक्त अध्यक्ष लायन कु. गार्गी आमोद ठक्कर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात आरोग्य, पर्यावरण, सामाजिक सेवा अशा उपक्रमाबरोबरच युवकांमध्ये कॅपॅसिटी बिल्डिंग आणि करिअर गायडन्स या क्षेत्रांमध्ये सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचे उद्दिष्ट व्यक्त केले.

मिलिंद पाटील यांनी अध्यक्ष व इतर सर्व पदाधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या समजावून सांगितल्या. उपाध्यक्ष म्हणून कुमारी प्रणाली सकपाळ, सेक्रेटरी म्हणून तनिष्क थळी, मेंबरशिप चेअरमन म्हणून दीपांशू तांडेल व संचिता पाटील या सर्व पदाधिकाऱ्यांना बॅचेस देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी सागर चौकर, मोनिका चौकर, दीपक

# विचुंबे रोडवर वृक्षारोपण अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्या वतीने वृक्षारोपण अभियान राबवले जात आहे. त्यापार्श्वभुमीवर विचुंबे रोडवर सोमवारी (दि.१८) वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले असून त्यांनी या वेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री आणि पनवेल महापालिकेच्या वतीने निसर्ग समृद्ध करणारे अभियान राबवल जात असल्याबद्दल त्यांचे आभार मानून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

या वेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, महापलिकेचे उपायुक्त वैभव विधाते, अरविंद सावळेकर, जयेश गांधी, प्रीया गुरनानी, राकेश प्रजापती, किशोर सुरते आदी उपस्थित होते.

# रसायनीत महिलांकरिता श्रावणसरी नृत्य स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मंगळागौर सांस्कृतिक परंपरा दृढ करण्यासाठी तसेच आपापसातील नातेसंबंध वृद्धीगत करण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅबिनेट मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून रसायनी पाताळगंगा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून सरपंच उमा मुंढे आणि माजी सरपंच संदिप मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांकरीता खालापूर तालुकास्तरीय श्रावण सरी पारंपारीक नृत्य स्पर्धेचे आयोजन मोहोपाडा येथील जनता विद्यालयाच्या सभामंडपात करण्यात आले होते.



या कार्यक्रमात तालुक्यातील दहा स्पर्धक गटांनी भाग घेतला होता. यात श्रावणसरी पारंपारीक स्पर्धेत प्रथम क्रमांक ज्ञानाई ग्रुप चांभार्ली यांनी रोख १०,००० व सन्मानचिन्ह पटकाविले, द्वितीय क्रमांक सखी महिला ग्रुप कांबे यांना ७००० रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक शिवतीर्थ खोपोली यांना ५००० रुपये, उत्तेजनार्थ एकमत ग्रामसंघ तळेगाववाडी यांनी ३००० रुपये व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ आई चामुंडा शेडवली यांना रोख ३००० रुपये व सन्मानचिन्ह पटकाविले.

ज्येष्ठ महिला आई माझी हौशी यात प्रथम इंदिरा पांडूरंग पवार, व्दितीय सीमा मनोहर म्हात्रे, तृतीय वृंदा विवेक ओक, उत्तेजनार्थ प्रभावती पंढरीनाथ बडगुजर, उत्तेजनार्थ निर्मला प्रल्हाद चव्हाण तसेच महिलांसाठी लकी ड्रॉ योजनेत प्रथम शारदा गणेश काळे रिस, व्दीतीय क्रमांक -अंकीता विशाल लहुजी खोपोली, तृतीय क्रमांक-पल्लवी संजय पोठरे यांनी पारीतोषिके पटकावली.

या वेळी राष्ट्रवादी कॉग्रेसच्या वासांबे महिला आघाडी अध्यक्षा वर्षा पाटील, पंचायत समिती अध्यक्षा रेश्मा चौधरी, ग्रामपंचायत सदस्या कविता मांडे, वनिता पारंगे, संगिता भोईर, स्वप्नाली मैद्रगीकर, ताई पवार, सदस्या रसिका खराडे, प्रतिक्षा राऊत, वेदीका पाटील, प्रशाली खाने आदीसह राष्ट्रवादी कॉग्रसच्या पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी वासांबे जिल्हा परिषद महिला विभाग, सरपंच उमा मुंढे, माजी सरपंच संदिप मुंढे व वरद टॉवर गणेशनगर यांनी अथक परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतोष चौधरी यांनी पाहिले.

# याकुब बेग हायस्कूल संकुलामध्ये स्वातंत्र्य दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल एज्युकेशन सोसायटी संचालित याकुब बेग हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, याकुब बेग प्रायमरी स्कूल आणि पीईएस इंग्लिश स्कूल यांनी संयुक्तपणे स्वातंत्र्यदिन साजरा केला. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल हुसेन काझी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

पनवेल शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरेदेखील समारंभात उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय एकात्मता गीताचे कौतुक केले आणि आपल्या भावना व्यक्त करताना आबिद मुन्शी सरांचे अभिनंदन केले. आणि येत्या काळात पनवेल शहरातील सर्व शाळांनी संयुक्तपणे याकुब बेग हायस्कूलमध्ये राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित गाण्यांचा एक मोठा कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा केली.

समारंभानंतर, पनवेल शहराने सुरू केलेल्या विशेष ड्रग्ज विरोधी मोहिमेबाबत मुलांची रॅली देखील काढण्यात आली. मुलांना संबोधित करताना नितीन ठाकरे सरांनी त्यांना मादक पदार्थांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आणि सतर्क आणि ड्रग्जमुक्त समाजाच्या निर्मितीवर भर दिला.

यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. याकूब बेग प्राथमिक शाळेतील मुस्तफा आरिफ कुरेशी, याकूब बेग हायस्कूलमधील मसिरा आरिफ कुरेशी आणि पीईएस इंग्लिश स्कूलमधील नुसरत नीरज अन्सारी यांनी राष्ट्रीय एकतेवर आधारित भाषणे दिली. याकूब बेग प्राथमिक शाळा आणि पीईएस इंग्लिश स्कूलने सादर केलेल्या फूड फेस्टिव्हलचे उद्घाटन पनवेल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अब्दुल मुकित काझी आणि पाहुण्यांनी केले.

पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल हुसेन काझी, उपाध्यक्ष अब्दुल मुकित काझी, सचिव अलीम पटेल, खजिनदार माज मुल्ला, सदस्य झुबेर पित्तु पनवेल एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष खालिद पित्तु, समाजसेवक अब्दुल हमीद पटेल आणि पनवेल शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींसह तिन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सर्व समारंभांमध्ये निवेदकाची जबाबदारी शिरीन घारे यांनी पार पाडली.



# शालोपयोगी वस्तूंचे वाटप व गुणवंतांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सकल मराठा समाज तक्रार निवारण मंचाच्या वतीने रसायनी पाताळगंगा परिसरातील ११० विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम सिध्देश्वर कॉर्नर रसायनी येथे मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. तर रसायनी पाताळगंगा परिसरातील शालेय ११० विद्यार्थ्यांना वह्या व स्टेशनरी किट, पेन आणि एक गुलाब पुष्प देवून गौरव करण्यात आला.

तसेच राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले काशिनाथ जाधव यांचा या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सल्लागार म्हणून अशोक महाडिक, हभप मोरे महाराज,अशोक पडवळ, शंकर गोडीवले आदी मान्यवरांसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकळ मराठा समाज-तक्रार निवारण मंचाचे अध्यक्ष महादेव कचरे, उपाध्यक्ष राजू बोराडे, कार्याध्यक्ष राम भोईर, वसंत चव्हाण, संतोष मालुसरे, गणेश सोनगरे, भरत राऊत, मनोज पाटील, मनोज पवार, राजेंद्र दसवते, गणपत गोठळ, रमेश मालुसरे, अंकुश भौड आणि समाजातील समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.




## श्रावण मास

सरीवर सरी श्रावण सरी
मनाच्या वेली नवपल्वती
सरीच्या तालावर झाडे झुलती
हरित धरती नटली सजली!

आनंद घेऊनी येती सण
निसर्ग ही देतो साथ सुंदर
नववधू नटली लेवून साज
जाण्या भाऊराया संगे माहेरास!

रंगीबेरंगी फुले फुलली
नवरंगाने धरती नटली
इंद्रधनुची कमान आकाशी सजली
उंबरठ्यावर रांगोळी रेखाटली!

श्रावणात माहेरी लेक आली
भिजले पदर ओल्या आठवणी
गर्द झाडाखाली मोकळी गाणी
गात होत्या सख्या सजणी!

सुगंधा संगे दरवळती
आसमंती गुंजन करती
आभाळही झुलते कळ्या ढगांनी
सरीवर सरी ओझरती धरतीवरी!


अंकुरले कोंब धरणीच्या कुशी
आनंदाने शेते शिवारे डोलती
ल्याली हिरवा शालू धरती
वाऱ्यासंगे गाणी गाती!

झाले मिलन तिचे पावसाशी
रोम रोम हर्षुनी फुलली
आनंदाने डोलू लागली
आल्या सरीवर सरी श्रावण सरी!



-कल्पिता नाईक, ठाणे

क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : पोयनाडजवळ कुर्डूस गावापासून तीन किमी अंतरावर असलेला धबधबा अतिशय सुंदर आहे. पूर्ण धबधब्यापर्यंत गाडी जाते. हिरवाईत नटलेला हा धबधबा एकदा तरी पर्यटकांनी पाहिला पाहिजे असा आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# वेतन सल्लागार समितीच्या सदस्यपदी ॲड. देशमुख

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनीकर्म विभागातर्फे किमान वेतन सल्लागार मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे. यात पाच मालक प्रतिनिधी पाच कामगार प्रतिनिधी व ४ स्वतंत्र प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे. यात एकूण पाच प्रतिनिधींपैकी नवी मुंबईतील भाजपचे ॲड. गणेश देशमुख यांची कामगार प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ही समिती संपूर्ण राज्यातील कामगारांच्या किमान वेतनाबाबत अभ्यास करून सल्ले व शिफारसी शासनाला सादर करणार आहे. त्यामुळे कामगारांच्या हिताचे निर्णय घेत त्यांना न्याय देण्याचे आवाहन या समितीवर असणार आहे.

# पालीत भाजपतर्फे दहीहंडी महोत्सव

## मानाच्या हंडीला नागोठण्याच्या आई जोगेश्वरी गोविंदा पथकाची सलामी

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडात दहीहंडीचा आगळावेगळा, भव्य उत्सव व जल्लोष पहावयास मिळाला. भाजप नेते प्रकाश देसाई यांच्या संकल्पनेतून व विशेष पुढाकाराने पालीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य दिव्य अशा दहीहंडी महोत्सवाचे अतिशय नियोजनबद्ध, मनोरंजनात्मक व वैभवपूर्ण आयोजन करण्यात आले होते.



पाली सुधागड तालुका भारतीय जनता पक्ष पुरस्कृत भव्य दहीहंडी महोत्सव २०२५मध्ये गोविंदा पथकांनी अक्षरशः बक्षिसांची लयलूट केली. भाजपच्या मानाच्या दहीहंडीचे माखन चाखत दोन लाख २२ हजार २२२च्या दहीहंडीवर नाव कोरणाऱ्या नागोठणेचा आई जोगेश्वरी गोविंदा पथकाने आठ चित्तथरारक थर लावून आकर्षक चषक व रोख पारितोषिक जिंकले. या महोत्सवात खासदार धैर्यशील पाटील यांची खास उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. सुधागडवासीय बाल गोविंदा पथकांसाठी भाजपची ५१ हजारांची मानाची दहीहंडी व आकर्षक चषकदेखील पर्वणी ठरली. सुधागड पाली मर्यादित दहीहंडी मध्ये यंगस्टार कुंभार आळी व भोईआळी पाली गोविंदा पथकाला प्रत्येकी २५ हजारप्रमाणे समान रकमेचे पारितोषिक देऊन चिठ्ठीद्वारे यंग स्टार कुंभार आळी गोविंदा पथकाला चषक देऊन गौरविण्यात आले.

या महोत्सवात सात थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांसाठी रोख रक्कम १० हजारांचे पारितोषिक तर सहा थरासाठी सहा हजार रुपयांचे पारितोषिक अशी एक अनोखी पर्वणी लाभल्याने गोविंदा पथकात उत्साह व नवचैतन्य पहावयास मिळाले. यावेळी पाच , सहा व सात थर लावून मानाची सलामी देणाऱ्या आई जोगेश्वरी गोविंदा पथक ७ थर, जय भवानी गोविंदा पथक रोठ खुर्द रोहा ७ थर, श्री बापदेव महाराज गोविंदा पथक अष्टमी रोहा ७ थर, जय हनुमान गोविंदा पथक कोलेटी ७ थर लावणाऱ्या गोविंदा पथकांना १० हजार रुपये रोख व आकर्षक चषक देऊन गौरविले. तर वीर संभाजी क्रीडा मंडळ चेंबूर ६ थर, श्री नवतरुण जाखमाता गोविंदा पथक वेलशेत सहा थर, यंग स्टार मित्रमंडळ कुंभारआळी पाली सुधागड सहा थर, भोईआळी गोविंदा पथक ६ थर,मरीआई गोविंदा पथक वांगणी रोहा सहा थर, चौडेश्वरी गोविंदा पथक वरवठणे रोहा सहा थर यांना सहा हजार व आकर्षक चषक देऊन गौरविले. तसेच विशेष पारितोषिक म्हणून जय भवानी रोठ खुर्द रोहा महिला गोविंदा पथक पाच थर दहा हजार रुपये व आकर्षक चषक, चौडेश्वरी गोविंदा पथक वरवठणे पाच थर दहा हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील, भाजप नेते प्रकाश देसाई, भाजप नेत्या गीता पालरेचा, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, आलाप मेहता, आरिफ मणियार, सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, दादा घोसाळकर, विठ्ठल सिंदकर, सुभाष पाटील, नरेश खाडे, शरद चोरघे, रोहन दगडे, प्रणाली शेठ, सुशील शिंदे, वैभव जोशी, दीपक पवार, नितीन परब, शिरीष सकपाळ, अरविंद फणसे, समृद्धी बारस्कर, रोहित भगत, विशाल गुरव, किरण खंडागळे आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबविणार -मंत्री तटकरे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आदिवासी वाडगाव येथे एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अलिबाग यांचे नियोजनातून नुतन अंगणवाडी बांधकाम करण्यात आले. या नुतन अंगणवाडीचा शुभारंभ १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्रदिनाचे औचित्याने महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी त्यांनी उपस्थितांना संबोधीताना जिल्हात स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबविणार असल्याचे सुतोवाच केले.

या वेळी त्याचे समवेत राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, राजिप जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक, तसेच सोहिता ओव्हाळ, अलिबाग पं.स.गटविकास अधकिारी दाईगडे, सहा.गटविकास अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी शर्मिला पाटील, राजिप उप अभियंता राहूल शेवाळे, विस्तार अधिकारी विजय मयेकर, पर्यवेक्षीका भाग्यश्री पाटील, सामिया पेरेकर, कल्पिता साळावकर, गिताजंली, पाटील, विनोदिनी मोकल,सरपंच अमित नाईक व अंजली मोकल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन वाडगाव ग्रामपंचायत व उपसरपंच तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी केले होते.

प्रारंभी अंगणवाडी विदयार्थ्यासह मंत्री अदिती तटकरे यांचेसह दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला. या वेळी माजी वाडगाव ग्रा.प. माजी सरपंच सरिता भगत यांनी महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांचे तसेच सरपंच सारिका पवार यांचे हस्ते राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांचे स्वागत पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे निमित्ताने मंत्री आदितीई तटकरे यांचे हस्ते ६ महिने पुर्ण मुलांच्या अन्नप्राशन, वाडगाव आदिवासी वाडीवरील गरोदर स्तनदा माताना बेबी केअर किट, तसेच लेक लाडकी च्या लाभार्थीना रूपये ५००० रुपये रोख धनादेश वाटप करण्यात आले. या वेळी वाडगाव ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासीवाडी रोड लाईट व विद्युतीकरण, तसेच हर घर जल नळ कनेक्श्न यांचा शुभारंभ मंत्री तटकरे यांचे हस्ते करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी वाडगाव ग्रा.प. उपसरपंच जयेंद्र भगत, सरपंच सारिका पवार, माजी सरपंच सरिता भगत तसेच ग्रामपंचायत सदस्य, सदस्या शुभांगी भगत, रूपाली प्रसाद पाटील, सजना नाईक,सरिता भगत,संतोष बोले, निलम नरेश थळे, ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.





# तरुणांना घडविण्यामध्ये ज्येष्ठांचे योगदान मोठे -आमदार महेंद्र थोरवे

**खोपोली : प्रतिनिधी**

तरुणांना घडविण्यामध्ये ज्येष्ठांचे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी ज्येष्ठ नागरिक सभा खोपोलीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात केले.



अध्यक्ष एल.बी. पाटील यांनी शाल, श्रीफळ देऊन आमदार थोरवांचा सत्कार केला. एल.बी. पाटील यांनी ज्येष्ठांच्या समस्या मांडल्या तसेच खोपोली संघाच्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला.

नंतर आमदारांच्या हस्ते लग्नास पन्नास वर्षे पूर्ण झालेले सौ.व.श्री. नारायण चौधरी तसेच सौ.रंजना व तुकाराम कळंबकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच खोपोलीतील विविध सामाजिक संस्थांच्या प्रमुखांचाही शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यात श्री बाबूभाई ओसवाल, शेखर जांभळे, प्रकाश राजोपाध्ये, सुनीता चव्हाण, दिना शहा, रेखा मोदी, अविनाश राउत, सुमीत जाधव यांचा समावेश होता.

किसन पवार यांच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने सुरुवात झाली. रवींद्र घोडके सरांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष सौ. सुप्रिया मेहेंदळे यांनी पसायदान म्हटले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. सेक्रेटरी नरेंद्र हर्डीकर, खजिनदार प्रवीण वेदक, सुरेन जाधव, पोहोकर, सुधा इतराज, श्रीमती जाधव, आंबुर्ले व सर्वंच सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेहनत घेतली.

# पाली आगरी समाज सभागृहासाठी प्रकाश देसाईंकडून पाच लाखांचा धनादेश

**पाली : प्रतिनिधी**

आगरी समाजाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी भाजप नेते प्रकाश देसाई यांनी पुढाकार घेत पालीच्या आगरी समाज सभागृहासाठी तब्बल पाच लाखांचा धनादेश सुपूर्द केला.



प्रकाश देसाई यांनी आगरी समाजाला दिलेला शब्द पाळत दहीहंडी महोत्सवाचे औचित्य साधून आगरी समाजाला राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील, भाजप नेते प्रकाश देसाई, भाजप नेत्या गीता पालरेचा, सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आगरी समाज अध्यक्ष ललित ठोंबरे, महिला कमिटी अध्यक्ष रंजना मढवी व पदाधिकारी, समाजबांधव यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द केला.

या वेळी आगरी समाजाचे अध्यक्ष ललित ठोंबरे, किरण खंडागळे (सचिव), स्वप्नील खंडागळे (खजिनदार), प्रदीप खंडागळे (सदस्य), महेश खंडागळे, दत्ताभाऊ काटकर, सचिन ठोंबरे तसेंच आगरी समाज महिला कमिटी अध्यक्ष रंजना मढवी, कांचन कुमार काटकर (सचिव), पल्लवी दीपक फोंडे (खजिनदार), सोनल उमेश मढवी (सल्लागार), शैला गोरखनाथ माळी (सल्लागार), सदस्य, सुप्रिया संदीप काटकर, जागृती विकास काटकर, भावना सुजित ठोंबरे, सुनीता सुनील काटकर, मनीषा प्रसाद म्हात्रे आदी उपस्थित होते.

# गोपाळकाल्याच्या निमित्ताने गरजूंना किराणा सामान वाटप

**पाली : प्रतिनिधी**

गोपाळकाल्यानिमित्त सुधागड तालुक्यातील रॉबिनहूड आर्मी संस्थेतर्फे १५० गरीबांच्या घरात किराणा सामान देण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटपही केले.

या वेळी सिद्धेश्वर आदिवासी वाडीत शाळेत विद्यार्थ्यांना वह्या, स्टेशनरी आणि प्रत्येक घरात किराणा मालाचे वाटप केले गेले. ह भ प महेश पोंगडे महाराज यांनी सांगितले की गरिबांना आणि कष्टकऱ्यांना या निमित्ताने मदतीचा हात देणे आवश्यक आहे. दहीहंडीचे स्वरूप बदलले, पण श्रीकृष्णाचा हेतू तोच ठेऊन आम्ही उत्सव साजरा केला, असेदेखील महेश पोंगडे महाराजांनी सांगितले.

या वेळी तुकाराम ठोंबरे, हभप भगवान दळवी महाराज, हभप दीपक कदम महाराज, कृष्णा वाघमारे, अशीका पवार, रॉबिनहूड आर्मी संस्था, ठाणे पदाधिकारी व सदस्य, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# गडबच्या श्रीराम गोविंदा पथकाने फोडली ललित पाटील मित्र मंडळाची दहीहंडी

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात अनेक भागांमध्ये दहीहंडी सोहळा मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. दहीहंडी सोहळा हा खर्या अर्थाने आता राजकीय पक्षांचा जनतेसमोर जाण्याचा जणू काही इव्हेंटच झालेला आहे. जिल्हयात दहा हजारांपासून पाच लाखांपर्यंत मोठ्या रक्कमेची बक्षिस ठेवून गोविंदा पथकांना आकर्षण करण्याचा एक सुलभ मार्ग राजकीय मंडळीला सापडला असला तरी या दहीहंडी उत्सवामुळे गावागावांमध्ये एकीचे वातावरण निर्माण होउन एकीचे बळ काय असते हे गोविंदा पथक दाखवत असतात.

मानवीमनोरे रचून सयंम, विश्वास, शिस्त आणि अंगावर काटा आणण्याचा थरार या उत्सवातून पहायला मिळतो. पुर्ण जिल्हयात मोठ्या प्रमाणात बक्षिस ठेवून हा उत्सव स्पर्धात्मक दृष्टया साजरा केला गेला. पेण तालुक्यात ललीत पाटील मित्र मंडळाचा गेली दोन दक्षके भरघोस



बक्षिस लावून दहीहंडी उत्सव साजरा केला जातो. यंदा या मित्र मंडळाच्या स्पर्धेत अनेक गोविंदा पथकांनी सहभाग घेतला होता. नियमांचे काटेकोर पालन करून ललीत पाटील मित्र मंडळाने शेवटी चार गोविंदा पथकांमध्ये बक्षिसांची रक्कम विभागून दिली.

श्रीराम गडब, रुद्रावतार गोविंदा पथक म्हैसबाड खारपाले, काळंबा देवी गडब, विठाई खारपाले यांच्यामध्ये बक्षिस विभागून दिली तर रुद्रावतार गोविंदा महिला पथक म्हैसबाड खारपाले यांनादेखील रोख रक्कम देवून सन्मानित करण्यात आले. ललीत पाटील मित्र मंडळाच्या आयोजना मध्ये नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी विशेष मेहनत घेउन शेवटची हंडी फुटेपर्यंत सर्व बाबींकडे बारकाई लक्ष दिले. या मित्र मंडळला खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवीशेठ पाटील यांच्यासह राजकीय,सामाजिक आणि शैक्षिण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

# बुज हास्य क्लबतर्फे रक्तदान शिबिर



**खालापूर : प्रतिनिधी**


बुज हास्य क्लब ह्य संस्थेच्या माध्यमातून गेल्या अनेक दिवसांपासून रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. रक्तदान हे सर्वात श्रेष्ठ दान आहे. याची जाणीव ठेवत रक्त दानातून सामाजिक बांधिलकी जपत २७८ रक्त दात्यानी रक्तदान केले. लोहाना समाज सभागृहात हास्य क्लब संस्थापाक अध्यक्ष बाबुभाई ओसवाल यांच्या नेतृत्वाखाली लोहाणा महाजन वाडी सभागृहात कार्यक्रम संपन्न झाला. या वेळी संस्थेच्या अध्यक्षा सोळंकी यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित बूज हास्य क्लब तर्फे १९ वा कार्यक्रम घेण्यात आला. ३६५ रक्तदानाचे उद्दिष्ट ठेवून शिबिराचे आयोजन केले होते. पारपडलेल्या या कार्यक्रमात २७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. खोपोली मध्ये आज पर्यंत सर्वात जास्त रक्तदान झाले. सहभागी रक्तदात्याचा स्मृती चिन्ह देवून सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री बाबूभाई ओसवाल, तसेच हास्य क्लबच्या अध्यक्षा सावित्री जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र ओसवाल, उपाध्यक्ष अशोक पोतदार, हेमंत नांदे, दीपक मालुसरे, शोभा धायगुडे, अर्चना दळवी, पुष्पा साळुंके, मोहन भिंगारे, गणेश साळुंके, विजय घोसाळकर, सुनील नांदे आदींनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

या वेळी माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, अतुल पाटील, इदरमल खंडेलवाल, ॲड. आकाश सोनावणे आदींसह शहरातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहत कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

# रोह्याच्या राजाचे जल्लोषात आगमन



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टच्या एक गाव एक गणेश उत्सव म्हणून ओळख असलेल्या रोहाच्या सार्वजनिक गणेशोत्सवचे १०४ व्या वर्षात पदार्पण होत आहे. रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या रोहयाच्या राजाचे रविवारी सायंकाळी आगमन झाले.

पारंपरिक वाद्यवृंद वाजवत रोहेकर ग्रामस्थ सहभागी होत रोहयातुन मिरवणूक काढण्यात आली. या वेळी मिरवणूकीत ग्रामस्थांनी ठेका धरला होता. राम मारुती चौकात श्री साईनाथ मोरे आळी गोविंदा पथकानी मानवी मनोरे उभे करीत सलामी दिली.

रायगड जिल्ह्यात पौराणिक व सामाजिक आशयाचे चल चित्रासाठी हा गणेश उत्सव प्रसिद्ध आहे. रविवारी सायंकाळी सोनार आळी, कुलकर्णी चौक, राम मारुती चौक करीत भाटेवाचनालय पर्यंत आगमानाची मिरवणुक काढली.

या वेळी मोठ्या संख्येने रोहेकर नागरिक, सर्व मंडळाचे आजी-माजी अध्यक्ष, सदस्य, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# होराळे येथील अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

**खोपोली : प्रतिनिधी**

श्री विठ्ठल रुक्मीणी मंदिर, होराळे, (दहागाव-छत्तीशी विभाग येथे गेली ४९ वर्ष हा सप्ताह सुरू असून उंच अश्या निसर्ग रम्य टेकडीवर हे विठ्ठल रखुमाईचे मंदिर आहे. या ठिकाणी हा अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. वारकरी संप्रदाय मंडळ, ह.भ.प. रामदास भाई महाराज पाटील (अध्यक्ष) संस्थापक, आध्यात्मिक शिक्षण संस्था गुरुकुल, महड यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेला सप्ताहाच्या निमित्ताने हिंदुचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्याख्यांन सत्राचे अयोजन करण्यांत आले.




श्री कृष्ण जन्मोत्वसाच्या निमित्त व संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जयंती सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या ठिकाणी काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायन, पसायदान, भजन, प्रवचन, किर्तन त्याच बरोबर जिल्ह्यातील किर्तनकार यांनी आपल्या अमृत वाणीतून वारकरी यांस मंत्र मुग्ध करीत आहे. तसेच काल्याचे किर्तन ह.भ.प. रामदास महाराज (भाई ) पाटील संस्थापक, आध्यात्मिक शिक्षण संस्था गुरुकुल महड यांचे झाले. या वेळी श्री कृष्ण चरित्र जागर करण्यांत आला.

काल्याचा महाप्रसाद शंकरशेठ मानकवळे (शिरवली), विजय कदम (वनवठे), राकेश जयराम जाधव (गोरठण बु.), उदय (राजु) विनायक शहासने (वाबो मित्र बंधु) यांच्या माध्यमातून देण्यांत येणार आहे.तसेच विठ्ठल रूक्मिणी देवस्थान कमिटी अध्यक्ष सदानंद रघुनाथ कदम, सचिव धोंडू रघुनाथ दाभणे, सचिव केशव ना. बुरुमकर, जनार्दन गो. हाडप तसेच सर्व पदाधिकारी, सदस्य, तसेच छत्तीशी विभाग होराळे मंदिर यांच्या माध्यमातून करण्यांत येत आहे.

# दुलीप ट्रॉफीमध्ये पूर्व विभागाला झटका

## ईशान-आकाश संघातून बाहेर





**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघात पुनरागमनाच्या प्रतीक्षेत असलेल्या यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशनला आणखी एक धक्का बसला आहे. दुखापतीमुळे तो दुलीप ट्रॉफी २०२५च्या पहिल्या सामन्यातून बाहेर झाला आहे. त्याच्यासोबतच इंग्लंड दौऱ्यात प्रभावी कामगिरी करणारा वेगवान गोलंदाज आकाश दीप यालाही विश्रांती देण्यात आली आहे. या दोन प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे पूर्व विभागाच्या संघात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत.

ईशान किशन पूर्व विभागाकडून दुलीप ट्रॉफीमध्ये सहभागी होणार होता, परंतु इंग्लंडमध्ये नॉटिंगहॅमशायरसाठी कौंटी क्रिकेट खेळताना झालेल्या दुखापतीतून तो अद्याप पूर्णपणे सावरलेला नाही. याच दुखापतीमुळे इंग्लंड दौऱ्यादरम्यान यष्टीरक्षक ऋषभ पंत जखमी झाल्यानंतरही त्याला बदली खेळाडू म्हणून भारतीय कसोटी संघात स्थान मिळू शकले नव्हते.

'ईएसपीएनक्रिकइन्फो'च्या वृत्तानुसार ई-बाईकवरून पडल्यामुळे किशनला अनेक टाके पडले होते. सध्या त्याची दुखापत गंभीर नसली तरी आगामी काळात त्याला भारत 'अ' संघाकडून दोन महत्त्वाचे सामने खेळायचे आहेत. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून त्याला दुलीप ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यातून वगळण्यात आले आहे. त्याच्या जागी पूर्व विभागाच्या संघात ओडिशाचा यष्टीरक्षक आशीर्वाद स्वेन याला संधी देण्यात आली आहे.

इंग्लंड दौऱ्यावर तीन कसोटी सामन्यांमध्ये चमकदार कामगिरी करणारा वेगवान गोलंदाज आकाश दीप याला विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तोदेखील पूर्व विभागाच्या संघाचा भाग होता. इंग्लंड दौऱ्यातील चौथ्या कसोटी सामन्यात तो किरकोळ दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. त्यामुळे खबरदारी म्हणून त्याला विश्रांती देण्यात आली आहे. आकाश दीप याने इंग्लंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांत १३ बळी घेतले होते तसेच नाईट वॉचमन म्हणून महत्त्वपूर्ण अर्धशतकही झळकावले होते. अभिमन्यू ईश्वरनच्या नेतृत्वाखालील संघात त्याच्या जागी आसामचा वेगवान गोलंदाज मुख्तार हुसैन याची निवड करण्यात आली आहे.

पूर्व विभाग आपल्या दुलीप ट्रॉफी मोहिमेची सुरुवात २८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीत शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील उत्तर विभागाच्या संघाविरुद्ध करेल. सर्व सामने बेंगळूरु येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स' येथे खेळवले जातील.

अष्टपैलू खेळाडू रियान परागला पूर्व विभागाचा उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. संघात मोहम्मद शमी आणि मुकेश कुमार या दोन अन्य आंतरराष्ट्रीय खेळाडूंचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, शमीने गेल्या दोन वर्षांत केवळ एकच प्रथम श्रेणी सामना खेळला आहे.

# सायकल शर्यतीत अलिबागच्या रायडर्सचा डंका



**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबईत प्रभादेवी येथे आयोजित प्रतिष्ठेच्या कस्टम पाईंट सायकल २०२५ या मानाच्या किताबासाठी झालेल्या २.२ किमी अंतराच्या सायकल शर्यतीत अलिबागच्या रायडर्सनी विजयी झेंडा फडकावत इतिहास रचला.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, सांगलीसह राज्यातील नामांकित स्पर्धकांना मागे टाकत प्रांजल पाटील यांनी प्रथम, सनित पाटील द्वितीय, तर विलास वाघमारे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. महिला गटात जुई नारकर पहिली, मिखेला डिसोझा दुसरी आणि सान्वी पाटील तिसरी ठरली.

१८ वर्षांखालील गटात वेदांत पानसरे पहिला, जिविन मार्लेशा दुसरा आणि हर्ष पाटील तिसरा आला. १४ वर्षांखालील गटात आर्यन लोहार पहिला, रुद्र बागवे दुसरा आणि विराज नाडर तिसरा ठरला. १० वर्षांखालील गटात स्वराज परब पहिला, लेटेशिया फर्नांडिस दुसरी आणि स्मित थोरात तिसरा आला. ४० वर्षांवरील गटात पंकज मार्लेशा पहिला, अनुप पवार दुसरा आणि किसन पवार तिसरा ठरला, तर गिअरवाली सायकल गटात श्रीकांत खडतरे प्रथम, प्रजामनी नाडर दुसरा आणि भूपेश तिसरा आला.

संस्थेच्या ४५व्या वर्धापन दिनानिमित्त विजेत्यांना आमदार महेश सावंत, रेखाताई देवकर, जिमी आल्मेडा, उद्योगपती चेतन, सचिन खाटपे, सचिन शिंदे, रियाज बट्टे, अमेय मलकापूर, संतोष धुरी, यशवंत किल्लेदार, सुप्रिया प्रधान आणि सुधीर जाधव यांच्या हस्ते चषक, पदक, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्ष योगेश मान कामे, हरीष देसाई, गणेश भाटकर आणि कस्टम पॉईंट कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नामुळे ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली असून रायडर्सचा उत्साह, प्रेक्षकांच्या टाळ्यांचा गजर आणि विजेत्यांचा आनंद यामुळे प्रभादेवीचा परिसर उत्सवमय झाला होता.

# कर्जतमध्ये रन फॉर एज्युकेशन मॅरेथॉन




**कर्जत : प्रतिनिधी**

लाइट ऑफ लाईफ ट्रस्टतर्फे जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे येथे रन फॉर एज्युकेशन मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. अनंदो टीम, जागृती टीम व खेळाडूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला.

या स्पर्धेचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी, सचिव डॉ. प्रशांत गांगल, डॉ. दिलीप सावळे, डॉ. गीतांजली राव-हजारे तसेच रोटरी क्लब ऑफ कर्जत, डिस्ट्रिक्ट ३१३१चे पदाधिकारी दीपचंद ओसवाल, माजी अध्यक्ष सतीश श्रीखंडे, योगेश राठी, विशाल शाह, सचिन हजारे आदींच्या उपस्थितीत झाले.

मॅरेथॉनची सुरुवात जीवन आशा सेंटरपासून पोसरी बसस्टँडपर्यंत हिरवा झेंडा दाखवून झाली. हा उपक्रम शिक्षणाच्या बळकटीसाठी सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक ठरला. प्रास्ताविक मुख्य व्यवस्थापक गौतम कानोजे यांनी केले.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

## गतिमंद मुलांनाही संधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक मंडळ आणि रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन २३ व २४ ऑगस्ट रोजी नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये प्रथमच गतिमंद मुलांची वेगळी स्पर्धा घेण्यात येणार आहे.

शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३०



वाजता त्यांच्याच हस्ते होईल.

स्पर्धेत गतिमंद मुलांचा गट, नवोदित मुली व मुले, ११, १३, १५, १७, १९, वर्षाखालील मुली व मुले, ज्येष्ठ पुरुष एकेरी व पुरुष व महिला एकेरी असे गट आहेत. स्पर्धेची जबाबदारी पराग अंकोलेकर व शामल डेबार्मा यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

# कॉलिन मुनरोचे विक्रमी शतक

**सेंट किट्स : वृत्तसंस्था**

कॅरेबियन प्रीमियर लीग २०२५च्या चौथ्या सामन्यात ट्रिनबागो नाइट रायडर्स संघाकडून सलामीवीराच्या रूपात तगडी बॅटिंग करताना कॉलिन मुनरो याने विक्रमी शतक झळकावले. न्यूझीलंडच्या ३८ वर्षीय बॅटरने वादळी खेळी करताना ५७ चेंडूत १२० धावांची खेळी केली. १४ चौकार आणि सहा षटकारासह बहरलेल्या खेळीसह त्याने शुबमन गिलच्या खास क्लबमध्ये एन्ट्री मारताना सूर्यकुमार यादव आणि गिल यांच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे.

सेंट किट्सच्या बैसेटेरे येथील वॉर्नर पार्क स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात शाहरुखच्या सहमालकीच्या ट्रिनबागो नाइट रायडर्स संघाकडून मैदानात उतरलेल्या कॉलिन मुनरो शतकी खेळीसह खास विक्रमाला गवसणी घातली. सीपीएलमध्ये शतक झळकवणारा तो दुसरा वयस्क खेळाडू ठरला आहे. ३८ वर्षे आणि १५९ वयात त्याने हा पराक्रम केला आहे. याबाबतीत फक्त ख्रिस गेल त्याच्या पुढे आहे. युनिवर्स बॉस ख्रिस गेलने ३९ वर्ष आणि ३५४ दिवस वयात



या लीगमध्ये शतक ठोकल्याचा रेकॉर्ड आहे.

**सूर्या-गिलच्या विक्रमाशी बरोबरी**

कॉलिन मुनरोने सेंट किट्स अँण्ड नेविस पॅट्रियट्स विरुद्धच्या शतकी खेळीसह दोन भारतीयांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. न्यूझीलंड बॅटरचे टी-२० क्रिकेटमधील हे सहावे शतक ठरले. सूर्यकुमार यादव आणि शुबमन गिल या दोघांनीही टी-२० क्रिकेटमध्ये सहा शतके झळकवल्याचा रेकॉर्ड आहे.

# जलतरण स्पर्धेत रूद्राणी पाटीलचे सुयश



**उरण : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून उरण नगर परिषद आणि महेश बालदी मित्र मंडळाच्या वतीने उरण येथे रायगड जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत रूद्राणी परेश पाटील हिने आठ वर्षाखालील गटामध्ये अप्रतिम कामगिरी करून आपले कौशल्य सिद्ध केले.


रूद्राणीने ५० मीटर फ्रीस्टाइल, बॅक स्ट्रोक आणि बटरफ्लाय या तीन प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक आणि ब्रेस्टस्ट्रोकमध्ये तृतीय क्रमांक मिळवून वर्चस्व सिद्ध केले. या कामगिरीबद्दल तिला तीन सुवर्ण व एक कांस्यपदक तसेच चॅम्पियनशिप ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले.

रूद्राणीच्या या यशामध्ये तिचे प्रशिक्षक समर्थ नाईक आणि सुजल मढवी यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, किशोर पाटील आणि सेक्रेटरी सुनील पाटील यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते.

# धोनीने माझी कारकीर्द संपवली!

## माजी क्रिकेटपटू इरफान पठाणचा आरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



महेंद्रसिंह धोनी 'कॅप्टन कूल' म्हणून ओळखला जातो. त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने अनेक स्पर्धांमध्ये यश मिळवले, पण आता एका माजी भारतीय क्रिकेटपटूने धोनीवर स्वतःची कारकीर्द संपवल्याचा धक्कादायक आरोप केला आहे.

भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाणने धोनीबाबत मोठे वक्तव्य केले आहे. यामागे त्याने कारण आणि घटना सांगत मोठा खुलासा केला. एका मुलाखतीत इरफानने सांगितले की,त्याला सातत्याने प्लेईंग इलेव्हनमधून बाहेर ठेवले जात होते आणि त्याने याबाबत कोचलादेखील थेट प्रश्न विचारला होता.

कोचबरोबर झालेल्या बोलण्याबाबत इरफान पठाण म्हणाला, २००९मध्ये गॅरी कर्स्टनने मला सांगितले की, तू चांगला खेळतो आहेस, पण युसूफ पठाण उत्कृष्ट खेळतोय. त्यामुळे संघ त्याची निवड करत आहे. आम्ही तेव्हा न्यूझीलंडमध्ये होतो. त्यापूर्वी मी आणि युसूफने श्रीलंकेमध्ये भारत गमावलेला असलेला सामना जिंकून दिला होता. संघाला २९ चेंडूत विजयासाठी ६० धावांची गरज होती आणि संघाने सात विकेट्स गमावल्या होत्या. त्यानंतरही आम्ही जिंकलो होतो, पण त्यांच्या जागी इतर कोणी असते, तर अशा सामना जिंकून देणाऱ्या खेळाडूंना कमीत कमी वर्षभरासाठी नक्कीच ड्रॉप केले नसते.

मी गॅरी कर्स्टनला मला प्लेईंग इलेव्हनमध्ये संधी का मिळत नाहीये याबद्दलही विचारले, जेणेकरून मी माझ्या खेळण्यात सुधारणा करू शकतो. त्यांनी मला दोन कारणे दिली. पहिले म्हणजे काही गोष्टी त्यांच्या हातात नाहीत आणि मी जेव्हा त्यांना विचारले की हे निर्णय कोण घेतेय, तेव्हा ते मला म्हणाले, मी तुला सांगू शकत नाही, असे इरफान पठाणने लल्लनटॉपला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

## बाबर, रिझवानला आशिया कपमधून डच्चू

**कराची : वृत्तसंस्था**

आगामी आशिया चषक स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पाकिस्तानचा संघ जाहीर केला आहे. पाकिस्तानच्या संघाची जबाबदारी सलमान अली आगाकडे सोपवण्यात आली आहे, तर संघातील अनुभवी फलंदाज बाबर आझम आणि यष्टीरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान यांची सुट्टी करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने अनुभवी खेळाडूंना बाहेर ठेवून युवा खेळाडूंवर विश्वास दाखवला आहे. संघात सलमान मिर्झा, सुफियान मुकीम आणि हसन नवाज यांना स्थान दिले आहे. वरिष्ठ खेळाडू म्हणून हॅरीस रऊफ, शाहीन आफ्रिदी, फखर जमान यांना संघात स्थान देण्यात आले आहे.

# रिंकू सिंहचा गोलंदाजीत जलवा

**लखनऊ : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेश प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात रिंकू सिंहच्या संघाने विजयी सलामी दिली. त्याच्या मेरठ मॅव्हेरिक्स संघाने कानपूर सुपरस्टार्सचा ८६ धावांनी पराभव केला. या सामन्यात मेरठचा कर्णधार रिंकूला फलंदाजीची संधी मिळाली नाही, पण त्याने गोलंदाजीत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली.

रिंकू सिंह पॉवरप्लेमध्येच गोलंदाजी करायला आला. त्याने चौथे षटक टाकण्याची जबाबदारी घेतली. तो रनअप घ्यायच्या तयारीत असताना समालोचक म्हणाले, माझे डोळे तर ठिक आहेत ना? हे मी काय पाहतोय? यानंतर रिंकूने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत समालोचक अजून चकित झाले. रिंकूने पहिल्याच चेंडूवर आदर्श सिंगला बाद केले.



रिंकू सिंह हा ऑफस्पिनर असून तो पार्ट टाईम गोलंदाज आहे. त्यामुळे फलंदाज त्याच्या गोलंदाजीवर मोठा फटका खेळण्याच्या तयारीत होता. फलंदाज स्टंप सोडून मोठा फटका खेळायला गेला आणि रिंकूचा योग्य लाईनवर टाकलेला चेंडू टप्पा पडून थेट स्टंपवर जाऊन आदळला. विकेट मिळताच रिंकूने गर्जना करत आक्रमक सेलिब्रेशन केले.

# सर्फराझ खानचे वादळी शतक

## मुंबईचा डाव सावरला



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा विस्फोटक फलंदाज सर्फराझ खानने मुंबईकडून खेळताना जबरदस्त शतक झळकावले आहे. इंग्लंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेत सर्फराझची संघात निवड झाली नव्हती. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत अनेक युवा खेळाडूंनी संधी देण्यात आली होती, पण सर्फराझला मात्र या संघातून वगळण्यात आले. त्याने आता संधी मिळताच शानदार शतक झळकावले आहे.

सर्फराझ खानने बूची बाबू स्पर्धेत खेळताना शानदार शतक ठोकले आहे. ही स्पर्धा तामिळनाडू क्रिकेट असोसिएशनद्वारे १८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत १६ संघ सहभागी झाले असून त्यांना प्रत्येकी चार या प्रमाणे चार गटात विभागण्यात आले आहे.

बूची बाबू स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताचा स्टार फलंदाज सर्फराझ खानने शतक झळकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. टीएनसीएविरुद्ध फलंदाजी करताना सर्फराझने पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतकी खेळी खेळली आणि संघाचा डाव सावरला. सर्फराझ जेव्हा फलंदाजीला आला तेव्हा मुंबईने ९८ धावांवर तीन विकेट्स गमावल्या होत्या. त्यानंतर सर्फराझने ९२ चेंडूत १०० धावांचा टप्पा गाठला. यादरम्यान त्याने नऊ चौकार आणि तीन षटकार लगावले.

सर्फराझ खान गेल्या काही दिवसांपासून त्याच्या फिटनेसमुळे चर्चेत आहे. टीम इंडियामध्ये निवड न झाल्याने त्याने फिटनेसवर खूप मेहनत घेतली. फक्त दीड महिन्यात सर्फराझने सुमारे १७ किलो वजन कमी करून सर्वांना आश्चर्यचकित केले. वजन कमी केल्यानंतर हा त्याचा पहिलाच सामना होता आणि या सामन्यात तो आपली छाप पाडण्यात यशस्वी झाला आहे. आता वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या घरच्या कसोटी मालिकेत आपले स्थान निश्चित करण्यावर सर्फराझच्या नजरा आहेत.

# महाराष्ट्र राज्य फिनस्विमिंग स्पर्धेत निवान वर्मा विजेता



**पुणे : प्रतिनिधी**

पनवेल येथील निवान वर्मा या चिमुकल्या जलतरणपटूने आपले कौशल्य दाखवत राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार यश संपादन केले आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल जलतरण तलाव, पुणे येथे पाचव्या महाराष्ट्र राज्य फिनस्विमिंग अजिंक्यपद स्पर्धात निवानने उत्कृष्ट कामगिरी करत ५० मीटर सरफेस मोनोफिन्स (ज्युनिअर ए मुलांच्या गटात) पहिला क्रमांक पटकावला.

केवळ ३९.९२ सेकंदात अंतर पार करत निवानने आपल्या पालकांचा तसेच पनवेलचा मान उंचावला. निवानला रॉयल कॉस्मो येथील राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू व प्रशिक्षक हसन शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल अंडरवॉटर स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. तपनकुमार पाणिग्रही आणि सचिव शिरीष अनंत पाटकी यांनी निवानचे अभिनंदन केले.

# बायर्न म्युनिकने जर्मन सुपर चषक जिंकला



**बर्लिन : वृत्तसंस्था**

आक्रमकपटू लुइस डियाझने पदार्पणात साकारलेल्या गोलमुळे बलाढ्य बायर्न म्युनिक संघाने स्टुटगार्टवर २-१ अशी मात करत जर्मन सुपर चषकाचे जेतेपद पटकावले. बायर्नचा अन्य गोल तारांकित आघाडीपटू हॅरी केनने नोंदवला.

केनचे हे कारकीर्दीतील दुसरे जेतेपद. मे महिन्यात बायर्नने 'बुंडसलिगा' जिंकली होती. त्या वेळी केनने पहिल्या जेतेपदाचा अनुभव घेतला होता. जर्मन सुपर चषकात केननेच बायर्नला आघाडी मिळवून दिली. त्याने १८व्या मिनिटाला हा गोल केला. यानंतर बायर्नने चेंडूवर ताबा राखला होता तसेच त्यांनी गोलच्या काही संधीही निर्माण केल्या, पण त्यांना मध्यंतरापर्यंत केवळ एका गोलच्या आघाडीचे समाधान लाभले.

उत्तरार्धातही बायर्नचे वर्चस्व राहिले. सामन्याच्या ७७व्या मिनिटाला सर्ज गनाब्रीच्या पासवर लुइस डियाझने गोल करत बायर्नची आघाडी दुप्पट केली. नव्या हंगामापूर्वी बायर्नने डियाझला इंग्लिश क्लब लिव्हरपूलकडून आपल्या संघात समाविष्ट करून घेतले. त्याने पहिल्याच सामन्यात गोल करत हा विश्वास सार्थ ठरवला.

यानंतर स्टुटगार्टने पुनरागमनाचा प्रयत्न केला. स्टुटगार्टचा आघाडीपटू निक वोल्टेमेडने मारलेला फटका बायर्नचा गोलरक्षक मॅन्युएल नॉयरने अप्रतिमरीत्या अडवला. ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत जेमी लेव्हलिंगने स्टुटगार्टचे गोलखाते उघडले, मात्र त्यांना दुसरा गोल करता आला नाही आणि बायर्नने जेतेपद पटकावले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com